**केडगाव, अहिल्यानगरमध्ये**
प्लॉट हवाय? प्लॉट विकायचा?
घर हवंय? घर विकायचंय?
जमीन हवी ? जमीन विकायचीय?
* ३० वर्षांची विश्वसनीय सेवा *
**शिवम प्रॉपर्टीज**
SHIVAM PROPERTIES
संपर्क - 9822116347, 9881620700



RNI No. 6153/57

# समाचार
SAMACHAR




गुलाबजामुन, पेढे (फिके कंदी), बासुंदी, जिलेबी, मलाई बर्फी, बुंदी लाडू, समोसा, ढोकळा, कचोरी
महाराष्ट्रासह जिल्ह्यातील प्रसिद्ध मिठाई श्रेणीतील एक अग्रगण्य नाव
१०३ वर्षे
**बन्सी महाराज मिठाईवाले**
रामचंद्र खुंट, अहिल्यानगर.
Mo. 9860566509



Volume - 74 | Issue- 227 | Marathi Daily | Wednesday 20/5/2026 | Pages - 6 | Price- Rs. 3




- उद्या -
**गुरूपुष्यामृतयोग**
सोने खरेदीचा, सुवर्णयोग..
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹९९९/-
**चंदुकाका ज्वेल्स**
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
- बुधवार चालू -


## उठाठेव

- विवेक मेहेत्रे




भाववाढीला कोण जबाबदार? या विषयाऐवजी पेपरफुटीला कोण जबाबदार? हा विषय ठेवलाय आज !

## निवडक

### पुण्यात टोळीयुध्दातून एकावर गोळीबार



**पुणे, दि. २०-** वनराज आंदेकर हत्याप्रकरणानंतर पुण्यात आंदेकर-कोमकर टोळीत सुरु झालेल्या गँगवॉरचा पुन्हा एकदा भडका उडाला आहे. वनराज आंदेकर हत्या प्रकरणातील आणखी एका आरोपीच्या भावावर बुधवारी सकाळी बालाजीनगर परिसरात आंदेकर टोळीच्या शुटर्सकडून गोळीबार करण्यात आला. आंदेकर-कोमकर टोळीतील गँगवॉरमधील हा चौथा हल्ला आहे. या घटनेमुळे पुण्यात खळबळ उडाली आहे. आंदेकर टोळी चालवणारा बंडू आंदेकर सध्या तुरुंगात आहे. मात्र, बंडू आंदेकर तुरुंगात बसूनही आपल्या टोळीची सूत्रे हलवत असल्याचे यानिमित्ताने पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. आंदेकर टोळीने त्यांच्या नेहमीच्या कार्यपद्धतीप्रमाणे हत्या घडवून आणण्यासाठी अगदी तरुण मुलांचा वापर केला. यामुळे पुणे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

### जिल्ह्यातील मेडिकल दुकानांना कुलूप

# औषध विक्रेत्यांचा देशव्यापी बंद

**समाचार/नगर-दि.२०**

भारतातील औषध विक्रेत्यांनी आज देशव्यापी संप पुकारला आहे. या संपात जिल्ह्यातील ८ हजार ३०० मेडिकल दुकानदारांनी सहभाग नोंदविला असून त्यांनी आपली दुकाने बंद ठेवली आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्था कोलमडली होती.

ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट संघटनेने देशव्यापी बंदची हाक दिली आहे. त्यामुळे आज देशभरातील मेडिकल दुकाने बंद आहेत. केंद्र सरकारने जीएसआर २२० (ई) आणि जीएसआर ८१७ (ई) या दोन्ही अधिसूचना रद्द करण्यात याव्यात, अशी मागणी संघटनेची आहे. या तरतुदींचा आधार घेऊन ऑनलाईन फॉर्मसी कंपन्या चुकीच्या पद्धतीने काम करत आहेत, असा आरोप करण्यात आला आहे.




बेकायदेशीर ऑनलाइन औषध विक्री आणि कॉर्पोरेट कंपन्यांकडून होणाऱ्या अव्यावसायिक स्पर्धेविरोधात देशव्यापी बंद पुकारण्यात आला आहे. या बंदमध्ये नगर शहर व जिल्ह्यातील सुमारे ८३०० औषध विक्रेते सहभागी झाल्याची माहिती मिळाली आहे. कोरोना काळात नागरिकांना सुविधा मिळावी, यासाठी केंद्र सरकारने होम डिलिव्हरीस विशेष परवानगी दिली होती. मात्र कोरोनाचा कालावधी संपून पाच वर्षे उलटूनही ही अधिसूचना रद्द करण्यात आलेली नाही. या सवलतीचा फायदा घेत ऑनलाईन कंपन्या स्वत: चे (पान ३ वर)

### पक्षसंघटनेत नाराज असल्याची चर्चा

# शरद पवार राष्ट्रवादी बैठकीला आ. रोहित पवार यांची दांडी!

**समाचार/मुंबई-दि.२०**

राज्यातील सध्याच्या राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर शरद पवार राष्ट्रवादीची राज्यव्यापी बैठक आज मुंबईत होत असून त्यासाठी पक्षाचे प्रमुख नेते आ. रोहित पवार उपस्थित राहणार नसल्याची माहिती आहे. आ. पवार हे पक्षांसघटनेत नाराज असल्याचेही सांगितले जाते. दरम्यान पक्षाचे सर्वे सर्वा खा. शरद पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत होणाऱ्या या बैठकीत दोन्ही राष्ट्वादीच्या विलीनीकरणाबाबत काय चर्चा होते, याकडे दोन्ही पक्षांच्या कार्यकर्त्यांचे लक्ष लागले आहे.

अजित पवार राष्ट्वादीतील अंतर्गत घडामोडींच्या पार्श्वभूमीवर या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष खा. सुनील तटकरे यांनी मध्यंतरी खा. शरद पवार यांची भेट घेतली होती. दरम्यानच्या काळात अजित पवार राष्ट्वादीचे राष्टीय कार्याध्यक्ष खा. प्रफुल्ल पटेल यांनीही खा. पवार यांची भेट घेतली. त्याबाबत राजकीय वर्तुळात चर्चा असतानाच शरद पवार राष्ट्वादीच्या सर्व प्रमुख नेत्यांची गुप्त बैठक पुण्यातील एका हॉटेलमध्ये झाली. त्यामुळे दोन्ही राष्ट्वादीच्या विलीनीकरणाची चर्चा पुन्हा सुरू झाली असतानाच खा. पवार यांनी पक्षाची राज्यव्यापी बैठक आज मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये बोलविली आहे. या बैठकीत अजित पवार राष्ट्वादीतील अंतर्गत घडामोडीं सह दोन्ही पक्षांच्या विलीनीकरणाबाबत चर्चा होण्याची शक्यता आहे. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती मृत्यूसह राज्यातील विविध प्रश्नावर आक्रमक (पान ३ वर)

### रणरणत्या उन्हात केली मानवी साखळी

# बीएसएनएल पेन्शनधारकांचे आंदोलन




**समाचार/नगर-दि.२०**

१ जानेवारी २०२६ पासून देय असलेल्या आयडीए वाढीची तात्काळ अंमलबजावणी करावी, तसेच जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीतील थकबाकी तत्काळ अदा करावी, या प्रमुख मागण्यांसाठी बीएसएनएल-एमटीएनएल पेन्शनधारकांनी बीएसएनएलच्या मुख्य कार्यालयासमोर धरणे आंदोलन केले. रणरणत्या उन्हात सुमारे २५० पेन्शनधारकांनी मानवी साखळी तयार करून केंद्र शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केला.

कमिटी ऑफ बीएसएनएल, एमटीएनएल पेन्शनर्स असोसिएशन्सच्या वतीने हे आंदोलन करण्यात आले. देशव्यापी आंदोलनाचा भाग म्हणून आयोजित करण्यात आलेल्या या आंदोलनात बीएसएनएलचे कर्मचारी तसेच सेवानिवृत्त कर्मचारी सहभागी झाले होते. जिल्हा सचिव आप्पासाहेब गागरे, दत्तात्रय भोर, शंकर घुगे, रवींद्र शिंदे आणि सुधाकर पवार यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन करण्यात आले. यावेळी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांनी केंद्र शासनाच्या धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त करत पेन्शनधारकांवर अन्याय होत असल्याचा (पान ३ वर)

### खा. शरद पवारांकडून पंतप्रधानांचे कौतुक

# मोदी जगात देशाची प्रतिष्ठा जपताहेत

**समाचार/मुंबई-दि.२०**

माजी केंद्रीय कृषिमंत्री आणि शरद पवार राष्ट्वादीचे सर्वेसर्वा खा. शरद पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाबाहेर म्हणजे संपूर्ण जगात भारताची प्रतिष्ठा जपण्याचे काम करत असल्याचे खा. पवार यांनी म्हटले आहे. दरम्यान ठाकरेसेनेचे नेते खा. संजय राऊत यांनी मात्र खा. पवार यांच्या वक्तव्याशी असहमती दर्शविली आहे.



मागील आठवड्यात खा. पवार यांनी पत्रकार परिषद घेऊन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली होती. मध्य पूर्वेतील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला काटकसरीचे आवाहन केले. त्यामुळे देशातील सामान्य जनतेसह उद्योजक, गुंतवणूकदारांमध्ये अस्वस्थता असल्याचे खा. पवार यांनी म्हटले होते. सध्याच्या परिस्थितीत पंतप्रधानांनी सर्वपक्षीय बैठक घेऊन सर्वांना विश्वासात घेत राष्टीय हिताच्या प्रश्नांवर निर्णय प्रक्रिया राबविण्याची मागणीही खा. पवार यांनी केली होती. त्यानंतर मंगळवारी मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमात खा. पवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे कौतुक केले आहे. पंतप्रधान देशाबाहेर जगभरात देशाची प्रतिष्ठा (पान ३ वर)


**पाहिजेत**

भिस्तबाग महाल, बांगडीवाला हाऊस, नायरा पेट्रोल पंप, आठरे पाटील पब्लिक स्कूल, नंदनवननगर इ.च्या जवळपास १ ते १.५ गुंठा NA प्लॉट हवा आहे.
- संपर्क -
9405037888



**पाहिजेत**

| | |
|---|---|
| पर्चेस ऑफिसर - | 1 |
| अकाऊंटंट - | 2 |
| टर्नर - | 4 |
| वेल्डर - | 2 |
| ड्रायव्हर - | 1 |
| हेल्पर - | 3 |

अर्जासह समक्ष भेटावे
पत्ता : सागर इंडस्ट्रीज, बी-80, साईबन रोड, एमआयडीसी, अ. नगर
पिन - 414111



'समाचार'चा अंक सुरु करण्यासाठी संपर्क
दिनेश कुलथे : ९८२२०३३१४०
ऑफिस : २३४५२७०


### भाजपा ४८, शिवसेना २९, राष्ट्रवादी २० टक्के फॉर्म्युला

# महायुती सरकारमधील महामंडळ वाटप लवकरच



**समाचार/मुंबई-दि.२०**

महायुती सरकारकडून लवकरच बहुप्रतिक्षीत महामंडळ वाटपाची प्रक्रिया पूर्ण केली जाणार असल्याची माहिती समोर आली आहे. महायुती सरकार सत्तेत आल्यापासून महायुतीमधील अनेक नेते आणि पदाधिकारी हे महामंडळांच्या वाटपाकडे डोळे लावून बसले आहेत. देवेंद्र फडणवीस यांनी भाजप आणि मित्रपक्षांच्या नेत्यांना महामंडळांचे जागावाटप लवकर पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

येत्या महिनाभरात राज्यातील महामंडळाचे जागावाटप पूर्ण होईल. महामंडळ वाटपाचा महायुतीचा फॉर्म्युला ठरला आहे. त्यानुसार, भाजपा ४८ टक्के, शिवसेना २९ टक्के आणि राष्ट्रवादी काँग्रेसला २० टक्के महामंडळ, असे सूत्र निश्चित करण्यात आले आहे. मात्र, कोणत्या पक्षाला कोणते महामंडळ मिळणार, हे अद्याप गुलदस्त्यात आहे. येत्या महिनाभरात यावर शिक्कामोर्तब होईल. महायुतीच्या पुढील बैठकीत महामंडळातील सदस्य वाटप होईल, असे सांगितले जात आहे. मुख्यमंत्री व दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या बैठकीत महामंडळ वाटपाच्या यादीवर अंतिम शिक्कामोर्तब होईल. यानंतर तिन्ही पक्षांचे नेते कोणत्या महामंडळावर कोणाची वर्णी लावायची हा निर्णय घेतील. त्यासाठी महायुतीचे अनेक नेते आणि पदाधिकारी देव पाण्यात बुडवून बसले आहेत. त्यामुळे आगामी काळात राज्यातील महत्त्वाच्या महामंडळाची सूत्रे कोणत्या नेत्यांकडे जाणार, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

# विधानपरिषद जागांबाबत एकत्रित निर्णय घेऊ : मुख्यमंत्री फडणवीस

**समाचार/मुंबई-दि.२०**

स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातून विधानपरिषदेवर निवडून द्यावयाच्या जागांबाबत महायुतीत एकत्रित बसून निर्णय घेतला जाईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले आहे. विधानपरिषदेच्या १६ जागांसाठी येत्या १८ जून रोजी निवडणूक होणार असून राज्यातील सत्ताधारी महायुतीत या जागांचे (पान ३ वर)


VISHWABHARATI ACADEMY'S
**COLLEGE OF ENGINEERING, AHILYANAGAR**
SAROLA BADDI, JAMKHED ROAD, AHILYANAGAR - 414 201
Mob. : 7030900703
(Approved by AICTE, New Delhi, Govt. of Maharashtra, Affiliated to S.P.Pune University)
Website: www.vacoea.in | Email : principal_vacoea@yahoo.com

**APPOINTMENT**

Applications are invited for the following posts from the eligible candidates.

| Sr. No. | Post | Departments | Vacancy |
|---|---|---|---|
| 1 | Accountant | Account | 03 |
| 2 | Lab Technician | Computer | 02 |
| 3 | Lab Technician | Mechanical | 02 |
| 4 | Lab Technician | Civil | 02 |
| 5 | Lab Technician | Electrical | 02 |
| 6 | Electrician | --- | 02 |
| 7 | Driver | --- | 02 |

QUALIFICATION , EXPERIENCE & PAY SCALE : As per AICTE, Government of Maharashtra & Savitribai Phule Pune University norms.
Note: Application along with full bio-data should contain attested Xerox copies of Certificates and testimonials should reach by post to The Secretary, Vishwabharati Academy's, College of Engineering, Sarola Baddi, Jamkhed Road, Ahilyanagar-414201 or Email at director@vacoea.com within 10 days from the date of publication of this advertisement.
Secretary



अहमदनगर जिल्हा मराठा विद्याप्रसारक समाजाचे,
**न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, अहिल्यानगर**
(A++)
इ. ११वी फुड प्रॉडक्ट टेक्नॉलॉजी (FPT)
२०२६-२०२७
**ऑफ लाईन प्रवेश सुरू (२५ जागा)**
इ. १२वी (FPT) पूर्ण झाल्यानंतर उपलब्ध संधी
- बी.एस्सी.इन. हॉस्पिटॅलिटी
- बी.एच.एम.सी.टी. बॅचलर इन हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड केटरिंग टेक्नॉलाजी
- जर्मनीमध्ये ड्युएल डिग्री.
- होमसायन्स, बी.बी.ए., बी.सी.ए. इ.
- करिअर संधी
- हॉटेल इंडस्ट्री
- आर्मी, नेव्ही व एअर फोर्स
- क्वॉलिटी कंट्रोल, आहारतज्ज्ञ व सुपरवायझर इ.

- प्रवेशासाठी संपर्क-
प्रा. सौ. तांबे पी. एस. ९४२३७८९४७२ | प्रा.पानसरे एन्. एस्. ७७६९०८५५३६ | प्रा. आडसूळ बी.एस्. ९४२२०८८७६४ | प्रा. साठे आर.के. ८८८८२३२४४०
प्रा. सुभाष गोरे सुपरवायझर | प्रा. सौ. कल्पना कानवडे उपप्राचार्या | प्रा. बाळासाहेब सागडे प्राचार्य

संपादकीय

# घसरण थांबणार कधी?

रुपयाचे अवमूल्यन हे काही एका दिवसात समोर आलेले संकट नाही. जागतिक पातळीवरील अस्थिरता, अमेरिकेच्या 'फेडरल रिझर्व्ह'ची व्याजदरवाढ, पश्चिम आशियातील युद्धजन्य परिस्थिती, कच्च्या तेलाचे वाढते दर आणि सुरक्षित गुंतवणुकीसाठी डॉलरकडे वाढणारा ओढा या सर्व कारणांचा परिणाम रुपयावर झाला आहे; मात्र भारतासाठी खरी समस्या अंतर्गत आर्थिक व्यवस्थापनातील कमतरता बाह्य घटकांइतकीच महत्वाची ठरत आहे. आर्थिक सुधारणा, रोजगारनिर्मिती, उत्पादनवाढ आणि निर्यातक्षमता या मूलभूत क्षेत्रांमध्ये अपेक्षित प्रगती न झाल्याने रुपयाची ताकद कमी होत गेली. रुपया घसरल्याचा सर्वात मोठा परिणाम सामान्य नागरिकांवर होतो. भारत हा मोठ्या प्रमाणावर आयात करणारा देश आहे. विशेषतः कच्चे तेल, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, यंत्रसामग्री, खते आणि अनेक प्रकारच्या औद्योगिक कच्च्या मालासाठी भारताला परकीय चलन खर्च करावे लागते. रुपया कमजोर झाला, की या आयाती महाग होतात. परिणामी, पेट्रोल-डिझेलचे दर वाढतात. वाहतूक खर्च वाढतो आणि त्याचा थेट परिणाम महागाईवर होतो. किराणा सामानापासून औषधांपर्यंत आणि बांधकाम साहित्यापासून उद्योगधंद्यांपर्यंत सर्वच क्षेत्रांवर याचा परिणाम जाणवतो. सामान्य माणसाच्या खिशावर महागाईचा वाढता ताण ही रुपयाच्या घसरणीची सर्वात कठोर शिक्षा असते. याशिवाय परदेशात शिक्षण घेणारे विद्यार्थी, वैद्यकीय उपचारांसाठी बाहेर जाणारे नागरिक आणि आयात-आधारित उद्योग हे सर्वच रुपयाच्या घसरणीमुळे अडचणीत येतात. डॉलर महाग झाल्याने शिक्षण शुल्क, राहणीमान आणि परदेशातील खर्च प्रचंड वाढतो. त्याचा रोजगारनिर्मितीवरही नकारात्मक परिणाम होतो. या पार्श्वभूमीवर सरकारची भूमिका अधिक प्रश्नांकित ठरते. भारतासाठी सर्वात चिंताजनक बाब म्हणजे या संकटावर दीर्घकालीन उपाययोजना दिसत नाहीत. निर्यातवाढीबाबत सरकार मोठमोठ्या घोषणा करत असले, तरी जागतिक स्पर्धेत भारतीय उत्पादन क्षेत्र अजूनही मागे आहे. 'मेक इन इंडिया'सारख्या मोहिमा अपेक्षित परिणाम देऊ शकलेल्या नाहीत. उत्पादन खर्च, ऊर्जा दर, धोरणात्मक अडथळे यामुळे भारतीय उद्योगांना स्पर्धात्मक फायदा मिळत नाही. परिणामी, आयात वाढते आणि व्यापार तूट कायम राहते. व्यापार तूट वाढली की डॉलरची गरज वाढते आणि रुपयावर दबाव येतो. ऊर्जा आयातीवरील भारताचे प्रचंड अवलंबित्व हे आणखी एक मोठे संकट आहे. पश्चिम आशियातील प्रत्येक संघर्षाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर थेट परिणाम होतो. तेलाचे दर वाढले, की भारताचा आयात खर्च वाढतो. अशा वेळी मजबूत रुपया देशासाठी सुरक्षा कवच ठरू शकतो; पण रुपयाच कमजोर असेल, तर दुहेरी फटका बसतो. दुर्दैवाने सरकारने ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने आवश्यक गती दाखवलेली नाही. आज रुपयाच्या प्रत्येक घसरणीसोबत सामान्य नागरिकांची क्रयशक्ती कमी होत आहे. बचतींचे मूल्य घटत आहे आणि अर्थव्यवस्थेतील अनिश्चितता वाढत आहे; मात्र या गंभीर प्रश्नावर सार्वजनिक चर्चेपेक्षा प्रतिमा व्यवस्थापनाला अधिक प्राधान्य दिले जात असल्याचे दिसते. शेअर बाजारात तात्पुरती तेजी दाखवून अर्थव्यवस्था मजबूत असल्याचा दावा केला जातो; पण चलनाचे वास्तविक मूल्य हे अर्थव्यवस्थेच्या आरोग्याचे अधिक स्पष्ट निर्देशक असते. रुपयाला स्थैर्य देण्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँकेने काही कठोर आणि दीर्घकालीन पावले उचलण्याची गरज आहे. निर्यातक्षम उद्योगांना प्रोत्साहन, उत्पादन क्षेत्रातील सुधारणांना गती, ऊर्जा आयात कमी करण्यासाठी पर्यायी स्रोतांमध्ये गुंतवणूक, वित्तीय तूट नियंत्रणात ठेवणे आणि गुंतवणूकदारांचा विश्वास पुनर्स्थापित करणे ही काळाची गरज आहे. त्याचबरोबर धोरणात्मक पारदर्शकता आणि स्थिरता आवश्यक आहे. जागतिक गुंतवणूकदारांना केवळ घोषणांपेक्षा धोरणांमधील सातत्य महत्त्वाचे वाटते. अर्थव्यवस्थेची क्षमता आणि वास्तव यात अंतर वाढत चालले आहे. रुपयाची घसरण हे त्या वाढत्या अंतराचेच प्रतीक आहे. सरकारने आणि रिझर्व्ह बँकेने वेळेत योग्य पावले उचलली नाहीत, तर रुपयावरील दबाव अधिक तीव्र होऊ शकतो. मध्यपूर्वेतील वाढत्या तणावाचा परिणाम केवळ कच्च्या तेलावर होत नसून, अन्य अनेक चीजवस्तूंवर होत आहे. भारतीय रुपयादेखील सातत्याने कमकुवत होत आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया जवळपास ९६ च्या आसपास येणे, ही स्थिती चिंताजनक म्हणावी लागेल. कच्च्या तेलाचा भाव प्रति बॅरल ११३ डॉलरवर गेला आहे. जागतिक तेल किमतीतील सतत होणारी वाढ आणि डॉलरची सततची मागणी, हे रुपयाच्या घसरणीचे प्रमुख कारण आहे. डॉलरच्या तुलनेत रुपया कमजोर झाल्यामुळे कच्चे तेल, औषधे, इलेक्ट्रॉनिक्स यासारख्या अनेक वस्तू आयात करण्यासाठी अधिक पैसे खर्चावे लागत आहेत. रुपयाच्या घसरणीमुळे वाहतूक, भाजीपाला, किराणा सामान आणि जीवनावश्यक वस्तू व सेवांच्या किमतीदेखील वाढणार आहेत कारण पेट्रोल, डिझेल, खते, आयात केले जाणारे अन्य कच्चे घटक हे सर्वच महागले आहे. आयातीवरील खर्च वाढल्यामुळे आयात आणि निर्यातीतील फरक, म्हणजेच व्यापारी तूट वाढणारच आहे. कंपन्यांचा उत्पादनखर्चही फुगू लागला असून हा अतिरिक्त खर्च ग्राहकांना द्यावा लागणार आहे. गेल्या बारा महिन्यांमध्ये रुपया डॉलरच्या तुलनेत बारा टक्क्यांनी घसरला आहे. सामान्यतः दर वर्षी रुपयाचे मूल्य तीन ते चार टक्क्यांनी घसरत असते, परंतु यावेळी ही घसरण जास्त आहे. २०१३ साली मॉर्गन स्टॅन्ले या जगद्विख्यात इन्व्हेस्टमेंट कंपनीने इंडोनेशिया (रूपिया) किंवा आयडीआर ब्राझील (रिआल), दक्षिण आफ्रिका (रँड), तुर्कस्तान (लिरा) आणि भारत (रुपया) यांची चलने ही फ्रॅजाइल, म्हणजेच ठिसूळ असल्याचे मत व्यक्त केले होते. हे सर्व उदयोन्मुख किंवा इमर्जिंग बाजारपेठांचे देश होत. अमेरिकेने आयात-निर्यात व्यापारावरील बंधने कठोर केल्याचा हा परिणाम आहे. आज रुपयाची घसरण रोखण्यासाठी निर्यात वाढली पाहिजे आणि भारतात जास्तीत जास्त परदेशी भांडवल आले पाहिजे.

## सीए रमेश फिरोदिया यांचा पुरस्काराबद्दल सत्कार



**समाचार/नगर-दि.२०**

अहिल्यानगर येथील प्रसिद्ध उद्योजक तथा सीए रमेश फिरोदिया यांना मुंबई येथे जैन सीए फेडरेशनचा प्रतिष्ठेचा जीवन गौरव पुरस्काराने नुकतेच सन्मानित करण्यात आले. या पुरस्काराबद्दल सीए रमेश फिरोदिया व सविता फिरोदिया यांचा चंगेडिया परिवारातर्फे सत्कार करण्यात आला.

यावेळी नितीन चंगेडिया, सतीश चंगेडिया. जवाहरलाल चंगेडिया. मनोज चंगेडिया, सुभाष भंडारी, निर्मल गांधी, जैन ओसवाल पतसंस्थेचे संचालक संतोष गांधी, निखिल मुथा आदी उपस्थित होते. नितीन चंगेडिया म्हणाले की, आमच्या चंगेडिया परिवाराचे व्याही असलेले सीए रमेश फिरोदिया यांचा पुरस्काराने झालेला सन्मान अभिमानास्पद आहे. एका छोट्याशा गावातून फिरोदिया यांनी आपल्या जीवन प्रवासाला सुरुवात करत मोठी गरूडझेप घेतली आहे.

सीए रमेश फिरोदिया म्हणाले, आयुष्यात स्वतः प्रगती करताना इतरांच्या प्रगतीसाठीही योगदान देण्यासारखा दुसरा आनंद नाही. आधुनिक काळात धार्मिक संस्कार आणि चांगले शिक्षण आवश्यक आहे. त्यामुळेच धार्मिक कार्यात योगदान देत असतो. नगरमध्ये मुलांना चांगल्या दर्जाचे शिक्षण मिळण्यासाठी विशेष प्रयत्न असतो. पुरस्कारामुळे समाजासाठी आणखी चांगले काम करण्याची प्रेरणा मिळते. चंगेडिया परिवाराने पुरस्कार मिळाल्याबद्दल केलेला सन्मान आनंद द्विगुणित करणारा आहे.

## इस्कॉनतर्फे सोमवारपासून भागवत कथा महोत्सव

**समाचार/नगर-दि.२०**

आंतरराष्ट्रीय कृष्णभावनामृत संघाच्या (इस्कॉन) अहिल्यानगर शाखेच्या पुढाकाराने अधिक मासानिमित्त श्रीमद् भागवत कथा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.



येत्या सोमवारपासून (२५ मे) ते रविवार ३१ मे २०२६ या काळात रोज सायंकाळी साडेपाच ते साडेआठ या वेळेत पुणे इस्कॉनचे मार्गदर्शक रेवतीनंदन दास यांची प्रवचने होणार आहेत. नवीन टिळक रस्त्यावरील माऊली सांस्कृतिक भवनात (नंदनवन लॉन्स शेजारी, अहिल्यानगर) येथे हा कथा महोत्सव होणार आहे. कीर्तन, कथा, आरती व महाप्रसाद उपक्रम यात होणार आहेत. गिरीवरधारी दास, डॉ. सतीश फाटके, वैष्णवतोष्णी दास व अंजली राधादेवी दासी यांच्यासह अन्य सदस्यांच्या पुढाकाराने हा उपक्रम होणार आहे.

अधिक माहितीसाठी ९६७३३९३८७२ यावर संपर्क साधावा. या श्रीमद् भागवत कथा महोत्सवात भाविकांनी सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# दर्जेदार देवेन वर्मा...

ओ. पी. रल्हन प्रमाणेच देवेन वर्मा सिने निर्मिती व दिग्दर्शनाच्या क्षेत्रात उतरला. १९६१ साली देवेन वर्माला बी. आर. चोपडा यांनी 'धर्मपुत्र' मध्ये शशीकपूरबरोबर एक किरकोळ भूमिका दिली. देवेन वर्माची कॉमेडी ही इतर सर्व कॉमेडियन्सपेक्षा वेगळी होती. त्याचा दर्जा वेगळा होता. निरागस चेहरा आणि गोंधळलेल्या अवस्थेतील देवेन वर्मा छोट्या छोट्या भूमिकांतूनही स्वत:चं वैशिष्ट्य दाखवून द्यायचा. 'गुमराह' मधील 'प्यारेलाल' या गंभीर सिनेमाचं वातावरण हलकं करतो व राजेश खन्नाच्या 'खामोशी' सिनमामध्ये पाण्याची बाटली दारू समजून पीत पीत 'मै दारू पी पी के देवदास बन गया हूं' इ. म्हणणारा पागल खान्यातला वेडा थोड्याच वेळात वातावरण मोकळं करतो.




गुलजारने शेक्सपिअरच्या 'कॉमेडी ऑफ एरर्स' या नाटकावरून बेतलेला 'अंगूर' हा नंबर वन कॉमेडी चित्रपटांपैकी एक! यात संजीवकुमार व त्याचा नोकर बहादूर (देवेन वर्मा) या दोघांचेही डबल रोल होते. मालक संजीवकुमारच्या भूमिका एकदम भिन्न. एक साधा सरळ तर दुसरा जरा छंदी. देवेन वर्मा अर्थात 'बहादूर'च्या समोर नेहमी प्रश्न पडतो की आपला नेमका मालक कोण त्याच्या वागण्यात असा कसा एकदम बदल झालाय? कारण इकडचा बहादूर तिकडे व तिकडचा इकडे. हा सगळा गोंधळ गुलजारने अप्रतिम रंगवला. संजीवकुमारच्या इतकीच देवेन वर्माची दुहेरी भूमिका अफलातून. अरुणा इराणी सोबत भांगेची भजी खाल्ल्यानंतर प्रसंग तर भन्नाट. अमिताभच्या 'कभी कभी' मध्येही त्याने मजा आणली. 'खट्टा मिठा' (अशोककुमारचा) मध्ये लग्नासाठी उतावळा झालेला देवेन वर्मा शेवटी लडकी है ना तो बस! म्हणजे लग्न करायला तयार असलेली मुलगी असली म्हणजे झालं. बाकी ती कशी का असेना! 'यात त्याचं 'मम्मी ओ मम्मी तू कब सास बनेगी' हे धमाल गाणं तो म्हणतो. यात ज्या मुलीशी तो लग्न करतो ती त्याची खरी पत्नी रुपा गांगुली. (अशोक कुमारची मुलगी) ती एकूण फारच वजनदार!

देवेन वर्मा हा ऑलराऊंडर कलाकार होता. त्याने धर्मेंद्र, शर्मिलाच्या 'देवर' मध्ये खलनायकाची भूमिका केली. मित्रासाठी स्थळ पहायला गेला असता ती मुलगी यालाच आवडते म्हणून तो पत्र बदलतो.

'बुड्ढा मिल गया' मधील त्याचा रोल अफलातून! त्याच्या बरोबरचा नवीन निश्चल अगदीच निश्चल. यात ओमप्रकाशणं गाणं म्हटलं की खून होणारच या भीतीने देवेनची होणारी थरथर पाहण्यासारखी. अशा अनेक चित्रपटात तो होता.

पुढे देवेन वर्माने 'नवरत्न फिल्मस' ही स्वत:ची निर्मिती संस्था काढली व १९६९ साली पहिला चित्रपट 'यकीन' सादर केला. धर्मेंद्रचा डबलरोल, शर्मिला व शंकर जयकिशनचं संगीत असल्याने यकीन हा ज्युबिली हिट झाला. यात देवेन वर्माने दिग्दर्शकाची जबाबदारी ब्रिज (Victoria 203 फेम) याच्याकडे दिली होती. यकीन मध्ये देवेनने छोटीशीच पण तिहेरी भूमिका केली. 'यकीन'च्या वेळी त्याची शंकर जयकिशनशी दोस्ती झाली. जयकिशनची कार पाहून देवेन वर्मा सहज म्हणाला की, 'क्या शानदार कार है...' आणि दुसऱ्याच क्षणी जयकिशनने त्याला ती कार भेट देऊन टाकली. नादान हा देवेन वर्माचा दुसरा चित्रपट. त्यात नायक नवीन निश्चिल... संगीत शंकर जयकिशनचं पण दिग्दर्शन स्वतः देवेन वर्मानं केलं. त्यामुळे तो नादान ठरला. चित्रपट फारसा चालला नाही.

नको त्या क्षेत्रात प्रवेश केला की असं होतं नादान मध्ये फटका बसला तरी बडा कबुतर, बेशरम, दानापानी या चित्रपटांच्या निर्मिती बरोबरच तो दिग्दर्शकही होता. यापैकी बेशरममध्ये अमिताभ, शर्मिला टागोर असूनही सुपर फ्लॉप व तेही अमिताभ हे नाव तेजीत असताना! बाकी 'बडा कबूतर' कधी उडून गेलं ते कळलंही नाही. 'बेशरम' मधील देवेन वर्माने एकट्याने रंगवलेली आई, बाप आणि मुलगा या तीन भूमिका अफलातून. 'बेशरम' मधील एकमेव लक्षात राहिलेली गोष्ट!

शेवटच्या काळात देवेन वर्माने मुंबईला रामराम ठोकला व पुण्याला स्थायिक झाला. तेव्हा त्याचं बरंच वय झालं होतं. पण मित्रवर्ग जयकिशननं भेट दिलेल्या कारमधून तो पुण्यात फिरत असे. स्वतःकडे पैसा असूनही मित्राची भेट अखेरपर्यंत जपून ठेवली. त्याचा फोटो व स्वत:चा लेख 'शंकर जयकिशन सात सुरोका साथ' या ग्रंथात आवर्जून छापलाय.

**- अनंत दसरे.**




### राशीभविष्य

- **मेष** : कामात अपेक्षित प्रगती होईल. मित्र-नातलगांचं सहकार्य लाभेल. शिक्षण क्षेत्रात संधी लाभतील.
- **वृषभ** : वैद्यकीय कारणांसाठी खर्च होईल. सरकारी कामं रखडतील. कलाकारांचा उत्साह वाढीस लागेल.
- **मिथुन** : आर्थिक व्यवहारात नुकसान संभवतं. मुलांच्या प्रश्नांचा ताण राहील. प्रकृतीची काळजी घ्यावी.
- **कर्क** : सुवार्ता कानी येईल. व्यवसायात नवे बदल हितकर ठरतील. प्रेम प्रकरणात वाद-विवाद संभवतात.
- **सिंह** : कामाचं योग्य मोल होईल. दूरच्या प्रवासाचे बेत आखाल. सांस्कृतिक क्षेत्रात संधी चालून येतील.
- **कन्या** : गुंतवणूक लाभदायक ठरेल. नव्या कामांमुळे उत्साह वाढेल. वाहनाचा वापर काळजीपूर्वक करावा.
- **तूळ** : हितशत्रूंच्या कारवाया वाढतील. आर्थिक प्रश्नांचा ताण राहील. कुलदेवतेची उपासना करायला हवी.
- **वृश्चिक** : प्रापंचिक समस्या हैराण करतील. जुनी येणी रखडतील. स्थावर प्रश्नात अडचणी वाढणार आहेत,
- **धनु** : घरगुती उद्योगात अनुकूलता राहील. कौटुंबिक सौख्य लाभेल. विवाहेच्छुकांना दिलासा मिळेल.
- **मकर** : चैनीवर अधिक खर्च होईल. घरात पाहुण्यांची वर्दळ राहील. गुंतवणुकीचा विचार तुर्तास करू नये.
- **कुंभ** : मनाजोग्या घटना घडतील. नोकरीत वरिष्ठांची मर्जी राहील. स्थावर प्रश्नाचा गुंता वाढू शकतो.
- **मीन** : थोरामोठ्यांचा सहवास लाभेल. मनाजोग्या घटना घडतील. बेरोजगारांना उत्तम दिलासा मिळेल.

### दिनविशेष

**२१ मे**

- **१९९१** : भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची हत्या.
- **२०१३** : इंडियन प्रीमियर लीगमधील स्पॉट फिक्सिंग प्रकरणात विंदू दारासिंगला अटक.
- **२०१७** : आयपीएलच्या अंतिम सामन्यात मुंबई इंडियन्सने रायझिंग पुणे सुपरजायंट्सचा एका धावेने पराभव केला.
- **२०१८** : केरळमधील कोझिकोड जिल्ह्यात दुर्मीळ अशा निपाह रोगाचा कहर. दहा जणांचे बळी गेले.

### आरोग्यमंत्र

## असे लाभ मिळवा

पूर्वीच्या स्वयंपाकघरामध्ये पितळ, लोखंडं, तांबं अशा धातूंची भांडी पहायला मिळतं. मधल्या काळात स्टेनलेस स्टीलचा बोलबाला वाढला आणि पितळ, तांब्याची भांडी मागे पडली. नंतर मात्र स्वयंपाकासाठी या धातूंचा वापर आरोग्यकारक असल्याचं समोर आलं आणि पुन्हा एकदा या भांड्यांना चांगले दिवस आले. आज अनेक घरांमध्ये पाणी साठवण्यासाठी तांब्याच्या भांड्यांचा वापर होताना दिसतो. या निमित्ताने तांब्याच्या भांड्यांच्या लाभासंबधी चर्चा करु या.



✻ आयुर्वेदानुसार सकाळी तांब्याच्या भांड्यातील पाणी प्यायल्याचे अनेक लाभ मिळतात. तांब्याच्या भांड्यात कमीत कमी आठ तास पाणी साठवून ठेवावं. या कालावधीत त्यातील चांगली तत्त्वं पाण्यात मिसळतात. या पाण्याच्या सेवनामुळे शरीरातील विषारी तत्त्वं बाहेर पडतात आणि आरोग्यासंबंधीचे लाभ मिळतात. ✻ तांब्याच्या भांड्यातील पाणी प्यायल्यामुळे त्वचेवरील सुरकुत्या, ढिलेपणा आणि मृत त्वचेचा थर नाहीसा होतो. साहजिकच त्वचेचं सौंदर्य उजळतं. ✻ शरीरावर गाठी येत असल्यास तांब्याच्या भांड्यात साठवलेल्या पाण्याचं सेवन करावं. या पाण्यामुळे शरीरातील युरिक ॲसिडची मात्रा कमी होते आणि गाठी तसेच शरीरावरील सूजेपासून आराम मिळतो. ✻ या पाण्याचं सेवन शरीरातील पोषक तत्त्वं वाढवणारं आहे. या पाण्यामुळे शरीरातील रक्ताची कमतरता दूर होते. अर्थात ॲनिमिया दूर होतो. त्यामुळेच पाणी साठवण्यासाठी तांब्याच्या भांड्यांचा वापर करायला हवा.

### जरा हटके

## प्रेम घट्ट होण्यासाठी?

लग्नानंतर नवरा-बायको एकाच छताखाली राहतात. लग्नाआधी नवरा-बायको दोघांचीही जीवनशैली वेगळी असते; पण लग्नानंतर सर्व काही बदलून जाते. भारतातील संस्कृती आणि विचारधाराही वेगळी आहे. भारतात लग्नानंतर नवरा-बायको एका छताखाली एकत्र राहतात, झोपतात; पण जपानमध्ये नवरा-बायको वेगवेगळे झोपतात, एकत्र झोपत नाहीत. जपानमध्ये नवरा-बायको एकत्र झोपत नाहीत याचे कारण त्यांचे एकमेकांवर प्रेम नसते, असे नाही. त्यांचे एकमेकांवर प्रेम असते; मात्र तरीही ते वेगवेगळे झोपतात. यामुळे नवरा-बायकोमधील प्रेम घट्ट होते असे सांगितले जाते. फक्त २९ टक्के जोडपी एकत्र झोपतात. टोकियो फॅमिलीजच्या रिपोर्टनुसार, जपानी गोरमेट वेबसाइट गाइड, गुरुनवीने २०१७ मध्ये यासंदर्भात एक सर्वेक्षणही केले होते. या सर्वेक्षणात २० ते ६९ वयोगटातील सुमारे १,६६२ जोडप्यांचा समावेश होता. त्यापैकी फक्त २९.२ टक्के जोडपी एकाच बेडवर झोपायची. इतर अनेक अहवालांनुसार, झोपण्याच्या या पद्धतीमागे वर दिलेली काही मुख्य कारणे आहेत.

### रसगंधा

## लज्जतदार फणस बिर्यानी

**साहित्य:** २०० ग्रॅम बासमती तांदूळ, १०० ग्रॅम कच्चा फणस, तीन कांदे, एक टी स्पून लसूण पेस्ट, आल्याचे लांब पातळ तुकडे एक टी स्पून, २ मोठ्या वेलच्या, एक छोटा चमचा जीरं, चार लवंगा, जावित्रिचे दोन तुकडे, दोन मोठे चमचे तूप, चमचाभर गरम मसाला, दहा रोस्टेड काजू, तेल, कोथिंबिर, चवीनुसार मीठ

**कृती:** फणसाचे एक इंच आकाराचे चौकोनी छोटे तुकडे करून घ्या. दोन कांद्यांचे लांब आणि बारीक काप करा. एक कांदा बारीक चिरून घ्या. कढईत तेल गरम करून फणसाचे तुकडे तळून घ्या. बाजूला काढून ठेवा. उरलेल्या तेलात कांद्याचे पातळ काप सोनेरी रंगावर तळा. कुकरमध्ये तूप गरम करून त्यात जीरं, खडे मसाले आणि लसणाची पेस्ट घालून परतून घ्या. यात बारीक चिरलेला कांदा घाला. सोनेरी रंगाचा होईपर्यंत परता. आल्याने तुकडे घालून पाच ते सात सेकंद परता. यानंतर यात तांदूळ, मीठ, गरम मसाला आणि पाणी घालून एक शिटी करा. कुकरमधली वाफ निघून गेल्यावर तो उघडा. त्यावर तळलेला फणस आणि कांदा घाला. कुकर थोडा वेळ झाकून ठेवा. थोडी थंड झाल्यावर वरून काजू आणि चिरलेली कोथिंबिर घालून खायला द्या.

### पंचांग

**गुरूवार, २१ मे २०२६**
पराभवनाम संवत्सर शके १९४८,
अधिक ज्येष्ठ शु. ५, चंद्रराशी : कर्क,
नक्षत्र : पुष्य, योग : गंड,
सूर्योदय ६.०५, सूर्यास्त ७.०६

### फॉरवर्ड्स

**रिश्तों क़ा कारोबार यू चल रहां हैं...**

**लफ्ज़ भीं अब मतलब तलाशते हैं...!**

### फिटनेस फंडा

✻ पर्सनल ट्रेनरची वर्क आऊटसाठी तुम्हाला तयार करण्याता बोलण्याची पद्धतही वेगळी असते. '२५ क्रंचेस काढ' असं थेट सांगण्यापेक्षा तो तुम्हाला वेगळ्या भाषेत हीच बाब सांगतो. सशक्त आणि सुडौल मांड्या ही मेन डीश आहे, ॲब्स साईड प्लेट असं म्हणत तुम्हाला कठीण व्यायाम करण्यासाठी प्रोत्साहित करतो. त्याचं हे बोलणंही परिणामकारक ठरतं.

✻ अलिकडेच एका क्रीडाविषयक मासिकाने केलेल्या पाहणीनुसार पर्सनल ट्रेनर असेल तर इच्छित फिटनेस लेव्हल गाठण्याची शक्यता ३० टक्क्याने वाढत असल्याचं निरीक्षण नोंदवण्यात आलं आहे.

### करिअरवाटा

## एनर्जी मॅनेजमेंटविषयी...

सध्याच्या यंत्र आणि तंत्राच्या युगात विजेची मागणी वाढती राहणं अपरिहार्य आहे. मात्र ही वाढती मागणी पूर्ण करेल इतक्या विजेचं उत्पादन न होणं ही आपल्याकडील मोठी समस्या आहे. सहाजिकच विजेचं नियोजन अत्यावश्यक ठरतं. कोणत्याही उद्योगामध्ये उत्पादन खर्चात विजेवर होणारा खर्च हा घटक मोठा असतो. त्यामुळे उत्पादन खर्च कमीत कमी आणून नफा वाढवायचा असेल तरीदेखील विजेचा कमीत कमी वापर करून उत्पादन कसं काढता येईल याचा सातत्याने विचार करावा लागतो. त्यादृष्टीने एनर्जी मॅनेजमेंट या व्यवस्थापनातील विषयाला महत्त्व प्राप्त झालं आहे. मोठ्या उद्योगांमध्ये असे एनर्जी मॅनेजर कौशल्याचा वापर करून कंपनीचा विजेवर होणारा खर्च वाचवतात. ही संधी प्राप्त करण्यासाठी एनर्जी मॅनेजमेंट पदविका अभ्यासक्रम उपलब्ध आहे. या अभ्यासक्रमामध्ये विजेची उपलब्धता, पायाभूत सुविधा, त्यावर होणारा खर्च आणि वीज टंचाईशी कसा सामना करावा या गोष्टींचा अभ्यास केला जातो. अशा बहुतांश संस्थांमध्ये ऊर्जा खात्याशी आणि व्यवसायाशी संबंधित असलेले तज्ज्ञ अध्यापन करतात. या अभ्यासक्रमाला प्रवेश घेण्यासाठी इच्छुक उमेदवार शक्यतो विज्ञान शाखेची पदवी घेतलेला असावा.



### खेचाखेची

## धडक

**पोलीस** : काय हो, तुम्हाला धडक देणाऱ्या त्या कारचा नंबर बघितला का किंवा तुम्ही कारमधल्या कोणाला बघितलं का?

नाही, पण मला खात्री आहे कार चालवणारी माझी सासू होती.

**पोलीस** : तुम्हाला असं का वाटतंय?

मी माझ्या सासूच्या हसण्याचा आवाज चांगला ओळखतो.


### वेगळं काही

स्वित्झर्लंडची राजधानी झुरिकमध्ये एक अनोखं रेस्टॉरंट आहे. १२५ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या या रेस्टॉरंटमध्ये फक्त शाकाहारी आणि वेगन पदार्थ मिळतात. गेल्या १२५ वर्षांपासून इथे एकही मांसाहारी पदार्थ शिजलेला नाही. १२५ वर्षांपासून शाकाहारी पदार्थ बनवणारं हे जगातलं एकमेव रेस्टॉरंट असल्यामुळे गिनिज बुकमध्येही याची नोंद करण्यात आली आहे. भारताचे माजी पंतप्रधान मोरारजी देसाई यांनीही या रेस्टॉरंटमध्ये जेवण घेतलं आहे. तसंच इतर प्रसिद्ध व्यक्तीही इथे जेवून गेल्या आहेत. हॉस हितल असं या रेस्टॉरंटचं नाव आहे. १८९८ मध्ये या रेस्टॉरंटची स्थापना झाली. सध्या हितल कुटुंबियांची चौथी पिढी रेस्टॉरंटची जबाबदारी सांभाळत आहे.

### माय स्पेस

## आभासी विश्व धोक्याचे

वैवाहिक जीवनातील शांतता आणि सामंजस्य जपणं ही अत्यंत महत्त्वाची पण तेवढीच अवघड बाब आहे. विशेषत: सध्याच्या सोशल मीडियाच्या प्रभावाच्या काळात सदोदित या माध्यमात व्यस्त असण्याच्या सवयीमुळे अनेकांचं वैवाहिक आयुष्य धोक्यात येत आहे. एका सर्व्हेनुसार पन्नास टक्के घटस्फोटांचं कारण सोशल मीडिया हे आहे.



सोशल मीडियाद्वारे सहज आणि सुलभ संवाद साधता येत असल्यामुळे विवाहबाह्य संबंध, नात्यांमध्ये विश्वासाचा अभाव या बाबी वाढत आहेत. सोशल मीडियासाठी जास्तीत जास्त वेळ देऊन पती-पत्नी एकमेकांसोबत घालवायच्या वेळेत तडजोड करताना दिसतात. त्यामुळे परस्परांमधील संवाद, प्रेमाचे क्षण जगता न आल्याने येणारा दुरावा वाढीस लागतो. मुख्य म्हणजे सामंजस्याने नात्यातील ताण-तणाव दूर करण्याऐवजी सोशल मीडियावर दु:खाला वाट करून दिली जाते. इथे तुमच्या भावनांचा गैरफायदा घेतला जाण्याची शक्यता असते. यामुळे सोशल मीडियावर वैयक्तिक आयुष्याविषयी व्यक्त होणं टाळा. कारण या जगात आणि वास्तवात कमालीचा फरक असतो. पण या बाबीकडे दुर्लक्ष केल्यामुळे मनात नकारात्मकता जन्म घेऊ लागते. हे टाळायला हवं.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahilyanagar (Ahmednagar) (M Corp), Dist.Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahilyanagar (M Corp), Dist Ahilyanagar (Ahmednagar), Pin Code- 414 001, Maharashtra.
Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहिल्यानगर (अहमदनगर) (एम कॉर्प), जिल्हा-अहिल्यानगर (अहमदनगर), पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले.
संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी. दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

# समाचार

बुधवार दि. २० मे २०२६ पान ३




## अर्ज़ किया है...

*इक मुलाक़ात का जादू कि उतरता ही नहीं*
*तिरी ख़ुशबू मिरी चादर से नहीं जाती है*

**- राहत इंदोरी**

जेव्हा आपण आपल्या अत्यंत प्रिय व्यक्तीला भेटतो, तेव्हा त्या भेटीचा आनंद केवळ त्या काळापुरता मर्यादित राहत नाही. ती भेट संपून गेल्यानंतरही, त्या व्यक्तीच्या आठवणी, तिची बोलण्याची पद्धत आणि तिचं अस्तित्व एका अदृश्य सुगंधासारखं आपल्या संपूर्ण आयुष्याला व्यापून टाकतं. प्रेमातील याच विलक्षण आणि न उतरणाऱ्या धुंदीला या शेरमध्ये अतिशय तरलतेने मांडले आहे.

### चंद्रचूड गोंगले यांची माहिती

## पुरातत्व वास्तू परिसरातील बांधकाम परवनगी शिथील होणार

**समाचार/नगर-दि.२०**

पुरातत्व वास्तू परिसरातील बांधकाम परवानगी शिथील होण्याच्या मार्गावर असल्याची माहिती निवृत्त जिल्हा न्यायाधीश यांनी दिली.केंद्र शासनाच्या प्राचीन स्मारके आणि पुरातत्वीय स्थळे व अवशेष कायदा, १९५८ नुसार प्राचीन ऐतिहासिक स्थलापासून १०० मीटरच्या आत कोणत्याही प्रकारची कायमस्वरुपी कायद्याने बांधकाम करता येत नाही.

तसेच त्या कायद्याप्रमाणे १०१ ते ३०० मीटर परिसरात पुरातत्व वास्तूच्या १०० मीटरच्या आत जागा असूनही कायमस्वरुपी बांधकाम करता येत नाही, म्हणून ता. १५/०३/२०२५ रोजी नगरचे रहिवासी चंद्रचूड गांगले, जिल्हा न्यायाधीश (नि) यांनी उच्च न्यायालयाचे व सर्वोच्च न्यायालयाचे व कायद्यातील कलमांचा संदर्भ देऊन सदरची अट शिथील करण्यासाठी निवेदन देऊन सतत पाठपुरावा केला व वेळोवेळी संबंधित



खासदार व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांची भेट घेऊन लेखी स्वरुपात महाराष्ट्र सरकार व केंद्र शासनाच्या संबंधित खात्याकडे सतत पाठपुरावा केला.संपूर्ण देश पातळीवरील हा प्रश्न असल्यामुळे व त्याचे गांभीर्य लक्षात घेऊन केंद्र सरकारने राज्य सभासदस्य संजयकुमार झा यांच्या अध्यक्षतेखाली सप्टेंबर २०२५ मध्ये समिती नेमली व सदर समितीने देशातील संरक्षित पुरातत्व वास्तूपासून १०० मीटर परिसरातील बांधकाम अथवा पुनर्विकासाला घातलेल्या बंधनांचा पुनर्विचार करुन लवचिकता आणण्याची शिफारस केली आहे.

### एकाचवेळी ३० खेळाडूंविरुध्द होणार प्रदर्शनीय सामना

# मोतीलाल फिरोदिया खुली बुध्दिबळ स्पर्धा २७ पासून

**समाचार/नगर-दि.२०**

शांतीकुमारजी फिरोदिया मेमोरियल फाउंडेशन प्रायोजित मोतीलालजी फिरोदिया अखिल भारतीय खुली क्लासिकल आंतरराष्ट्रीय मानांकन बुद्धिबळ स्पर्धा बुधवार दि. २७ मे ते रविवार दि. ३१ मे २०२५ या कालावधीत येथील लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय, स्टेशन रोड येथे आयोजित करण्यात आली आहे. अशी माहिती अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी दिली.

या स्पर्धेत देशभरातील नामांकित बुद्धिबळपटू सहभागी होणार असून गुजरात, आंध्र प्रदेश, गोवा, तमिळनाडू, महाराष्ट्र आदी राज्यांतील दोनशेहून अधिक खेळाडूंनी आतापर्यंत आपला सहभाग निश्चित केला आहे. तसेच अनेक दिग्गज बुद्धिबळपटूही स्पर्धेत सहभागी होणार असल्याची माहिती संघटनेचे उपाध्यक्ष नरेंद्र कुलकर्णी यांनी दिली. विशेष म्हणजे अवघ्या साडेपाच वर्षांच्या



बाल बुद्धिबळपटूपासून ते ७५ वर्षीय ज्येष्ठ खेळाडूपर्यंत विविध वयोगटातील स्पर्धक या स्पर्धेत आपल्या बुद्धीचे कौशल्य पणाला लावणार असल्याचे सचिव यशवंत बापट यांनी सांगितले.

या स्पर्धेचे प्रमुख आकर्षण ठरणार आहेत रशियन ग्रॅंड मास्टर पेट्र किरियाकोव. त्यांच्या सहभागामुळे स्पर्धेचा दर्जा अधिक उंचावला असून बुद्धिबळप्रेमींमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे ग्रँड मास्टर पेट्र किरियाकोव हे बुधवार दि. २७ मे रोजी सकाळी ९-३० वाजता लक्ष्मीनारायण मंगल कार्यालय येथे एकाचवेळी ३० खेळाडूंविरुद्ध प्रदर्शनीय सामना सुद्धा खेळणार आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन बुधवार दि. २७ मे रोजी सकाळी ११.३० वाजता होणार असून त्यानंतर स्पर्धेला प्रारंभ होईल. स्पर्धेत एकूण ९ फेऱ्या खेळविण्यात येणार आहेत. अंतिम बक्षीस वितरण समारंभ रविवार दि. ३१ मे रोजी दुपारी ३ वाजता अहमदनगर जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांच्या हस्ते होणार आहे.स्पर्धेतील विविध गटांतील विजेत्यांना रोख पारितोषिके, आकर्षक ८५ करंडके तसेच सर्व सहभागी खेळाडूंना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. विशेष बाब म्हणजे या स्पर्धेत आंतरराष्ट्रीय दर्जाचे १०० लाकडी बुद्धिबळ पट आणि सोंगट्यांचा वापर महाराष्ट्रात प्रथमच करण्यात येणार आहे. स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी व नावनोंदणीसाठी- यशवंत बापट- ९३२६०९२५०१, पारूनाथ ढोकळे- ९८५०७०४२६८ यांच्याशी संपर्क साधावा.

## पान १ वरुन

### औषध विक्रेत्यांचा देशव्यापी बंद

भागभांडवल वापरून मोठ्या प्रमाणावर सवलती देत औषध विक्री करत असल्याचा आरोप औषध विक्रेत्यांनी केला आहे. दरम्यान, बंदच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व औषध विक्रेत्यांनी औषधे व सौंदर्य प्रसाधने कायदा आणि शासनाच्या आदेशांची अंमलबजावणी करणे बंधनकारक आहे. त्यामुळे त्यांनी या संपात सहभागी होऊ नये, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाने केले आहे.

### राष्ट्रवादी बैठकीला आ. रोहित पवार यांची दांडी!

भूमिका घेणारे शरद पवार राष्ट्रवादीचे नेते आ. रोहित पवार मात्र या बैठकीस उपस्थित राहणार नसल्याची माहिती आहे. आ. पवार हे पक्षात नाराज असल्याचेही सांगितले जाते. आ. पवार यांनी गेल्या काही महिन्यात अजित पवार राष्ट्रवादीचे नेते खा. प्रफुल्ल पटेल आणि खा. सुनील तटकरे यांच्यावर सातत्याने टीकास्त्र सोडले आहे. जनतेच्या विविध प्रश्नांवर आपल्या पक्षाचे नेते आक्रमक होत नसल्याचीही त्यांची तक्रार असल्याचे बोलले जाते. याच कारणांमुळे आ. पवार आजच्या पक्षाच्या बैठकीला उपस्थित राहणार नसल्याचे सांगितले जाते. दरम्यान आजच्या बैठकीला शेतकऱ्यांच्या पाण्याच्या प्रश्नांसाठी उपस्थित राहणार नसल्याबद्दल आपण पक्षाच्या नेत्या खा. सुप्रिया सुळे यांची परवानगी घेतली असल्याचे आ. पवार यांनी म्हटले आहे.

### बीएसएनएल पेन्शनधारकांचे आंदोलन

आरोप केला.सार्वजनिक उपक्रम विभागाने दि. २७ फेब्रुवारी २०२६ रोजी काढलेल्या आदेशामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. या आदेशानुसार १ जानेवारी २०२६ पासून लागू होणारी आयडीए वाढ अधिसूचित करण्यात आली होती; मात्र त्यामध्ये आर्थिक परिणाम संदर्भातील असामान्य अट समाविष्ट करण्यात आली. त्यामुळे प्रत्यक्षात पेन्शनधारकांना वाढीचा लाभ मिळू शकला नाही.यानंतर देशभरातील सुमारे चार लाख पेन्शनधारकांनी १६ एप्रिल २०२६ रोजी देशव्यापी आंदोलन केले होते. या आंदोलनानंतर डीपीईने २४ एप्रिल २०२६ रोजी नवीन आदेश जारी करून १ एप्रिल २०२६ पासून लागू होणारी आयडीए वाढ अधिसूचित केली. विशेष म्हणजे या नव्या आदेशात आर्थिक परिणाम ही अट वगळण्यात आली. मात्र, १ जानेवारी २०२६ पासून देय असलेली आयडीए वाढ अद्याप लागू करण्यात आलेली नसल्याने आणि जानेवारी ते मार्च २०२६ या कालावधीतील थकबाकीही न मिळाल्याने पेन्शनधारकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

### मोदी जगात देशाची प्रतिष्ठा जपताहेत

जपण्याचे काम करत असल्याचे विसरून चालणार नाही, असे खा. पवार यांनी म्हटले आहे. वैचारिक भूमिका वेगळी असली तरी इथं राजकीय मतभेद करायचे नसतात, असेही खा. पवार यांनी पंतप्रधान मोदी यांचे कौतुक करताना म्हटले आहे. ठाकरेसेनेचे नेते खा. संजय राऊत यांनी मात्र खा. पवार यांच्या वक्तव्याशी आपण अजिबात सहमत नसल्याचे म्हटले आहे.

### विधानपरिषद जागांबाबत एकत्रित निर्णय घेऊ : मुख्यमंत्री

कसे वाटप होणार, याबाबत राजकीय वर्तुळात उत्सुकता आहे. पुणे स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील जागेसाठी महायुतीत अजित पवार राष्ट्रवादी आग्रही असून कोकणातील जागेसाठी शिंदेसेना आणि राष्ट्रवादीत रस्सीखेच आहे. अहिल्यानगरच्या जागेसाठी भाजपा आणि राष्ट्रवादी हे दोन्ही पक्ष इच्छुक असून ही जागा कुणाकडे जाते, याची मोठी उत्सुकता आहे.

### बहुजन समता पार्टीचा आरोप

## दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीचा गैरवापर

**समाचार/श्रीगोंदा-दि.२०**

श्रीगोंदा नगर परिषदेकडून लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेच्या निधीचा गैरवापर करण्यात आल्याचा आरोप बहुजन समता पार्टीच्या वतीने करण्यात आला आहे. यासंदर्भात तहसीलदारांना निवेदन देण्यात आले असून संबंधित कामाची चौकशी करून कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, श्रीगोंदा शहरातील म्हेत्रे मळा ते अशोक हिरडे यांच्या घरापर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण हे काम लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत करण्यात आले. ही योजना दलित व नवबौद्ध समाजाच्या वस्त्यांमध्ये मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने सुरू केलेली असताना संबंधित परिसरात शासन निकषानुसार आवश्यक दलित व नवबौद्ध लोकसंख्या नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.



स्थानिक नागरिकांच्या माहितीनुसार व प्रत्यक्ष पाहणीत सदर भाग पात्र नसतानाही योजनेचा निधी वापरण्यात आल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे दलित समाजाच्या विकासासाठी असलेला निधी इतरत्र वळवून संबंधित समाजाला योजनांपासून वंचित ठेवले जात असल्याचा आरोप बहुजन समता पार्टीने केला आहे. तसेच या प्रकारामुळे दलित समाजामध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून संबंधित कामाचा जाहीर निषेध करण्यात आला आहे. दरम्यान, निवेदनामध्ये संबंधित कामाची तात्काळ चौकशी करणे, मंजूर निधी व प्रशासकीय मान्यतेची माहिती सार्वजनिक करणे, नियमांचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर कारवाई करणे तसेच दलित वस्ती सुधार योजनेचा निधी केवळ पात्र दलित व नवबौद्ध वस्त्यांमध्येच वापरण्याची मागणी करण्यात आली आहे.

## जाधव यांचे जीवन प्रेरणादायी ठरले- प्रा. पठारे




**समाचार/नगर-दि.२०**

सुषमा जाधव या आपल्यातून गेल्या असल्या तरी त्यांचे जीवन प्रेरणादायी होते, असे प्रतिपादन सीएसआरडीचे संचालक प्रा.सुरेश पठारे यांनी केले.

संस्थेच्या जेसिपीआर (पत्रकारिता अभ्यासक्रम ) च्या माजी विद्यार्थिनी आणि अहिल्यानगर आकाशवाणीच्या माजी उद्घोषिका सुषमा जाधव- अमर यांचे अलीकडेच निधन झाले.त्याच प्रमाणे जेसिपीआरचे माजी विद्यार्थी व जिल्हा बँकेचे जनरल मॅनेजर सुरेश पाटील यांचे वडील आणि जगदंबा शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष रामराव पाटील यांचेही नुकतेच निधन झाले. जाधव व पाटील यांना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी सीएसआरडी संस्थेत आयोजित सभेत पठारे बोलत होते.यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे सेक्रेटरी सुभाष लांडे ,न्यायधार संस्थेच्या अध्यक्ष ॲड. निर्मला चौधरी आदी उपस्थित होते. पठारे म्हणाले, पत्रकारिता अभ्यासक्रमात मानवी मूल्ये शिकविली जावीत, असा सुषमा जाधव यांचा आग्रह असे.

कार्यक्रमात ॲड.निर्मला चौधरी,प्रा. रवींद्र सातपुते, एसटीचे माजी अधिकारी सुनिल ओहोळ,सामाजिक कार्यकर्त्या संध्या मेढे,आकाशवाणीचे अधिकारी मुझ्मिल पटेल,दिलीप चव्हाण,कॉ.प्रवीण सोनवणे,दत्ता परभणे यांनी विचार व्यक्त केले.जेष्ठ पत्रकार कैलास ढोले यांनी सुरेश पाटील यांचा मेसेज तर सुष्मिता अय्यंगार यांनी अलका जैन आणि आकाशवाणीतील निवेदिका वृषाली पोंदे यांचे मेसेज वाचून दाखविले. प्रास्ताविक प्रियदर्शन बंडेलु यांनी केले तर सूत्रसंचालन महेबुब सय्यद यांनी केले. कार्यक्रमास मनपाच्या माजी प्रसिद्धी अधिकारी नीलिमा बंडेलु,मनपाचे माजी विरोधी पक्ष नेते बहिरनाथ वाकळे,मनपाचे माजी उपायुक्त दिगंबर कोंडा,प्रकाशजीत अमर, अजिता एडके, तारा सातपुते आदी उपस्थित होते.

## उसने पैसे देण्यास नकार दिल्याने युवकाला मारहाण

**समाचार/नगर-दि.२०**

पैसे उसने देण्यास नकार दिल्याने एका युवकाला शिवीगाळ व लाकडी दांडक्याने बेदम मारहाण करण्यात आल्याची घटना घडली आहे. मारहाण केल्यानंतर आरोपींनी युवकाच्या खिशातील रोकड आणि मोबाईल जबरदस्तीने काढून घेत जिवे मारण्याची धमकी दिली. ही घटना सारसनगर येथील पुलाजवळ घडली असून, या प्रकरणी पोलिसांत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

शुभम अनिल हराळ ( वय २६) यांनी या प्रकरणी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी मयूर छबुराव कांडेकर आणि गोट्या रासकर (दोघे रा. सारसनगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी शुभम हे सारसनगर भागातून जात असताना दोन्ही आरोपी त्या ठिकाणी आले.

तू बरेच दिवस झाले मला भेटला नाहीस असे म्हणून मयूर याने शुभमकडे दोन हजार रुपये उसने मागितले. शुभम यांनी माझ्याकडे पैसे नाहीत असे सांगताच आरोपींना राग आला. पैसे न दिल्याच्या रागातून आरोपींनी शुभम यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. त्यानंतर मयूर याने हातातील लाकडी दांडक्याने शुभम यांच्या पाठीवर आणि हातावर जोरात प्रहार केले, तर गोट्या रासकर याने लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. मयूर याने शुभम यांच्या खिशातील दोन हजार रुपयांची रोकड आणि मोबाईल फोन जबरदस्तीने काढून घेतला.

### पंडित नेहरुंचा पुतळा हटविण्याची मागणी दुर्दैवी

## अवमानकारक मागणीचा काँग्रेसकडून निषेध

**समाचार/नगर-दि.२०**

अहिल्यानगर महानगर पालिका हद्दीतील लाल टाकी परिसरात उभारण्यात आलेल्या भारताचे पहिले पंतप्रधान, आधुनिक भारताचे शिल्पकार पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या पूर्णाकृती पुतळ्याबाबत काही व्यक्तींनी केलेली हटवण्याची मागणी ही अत्यंत दुर्दैवी, निषेधार्ह आणि इतिहासाचा अपमान करणारी आहे, अशी तीव्र प्रतिक्रिया काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी व्यक्त केली आहे.

लाल टाकी येथील हा पुतळा तत्कालीन नगराध्यक्ष नवनीतभाई बार्शीकर यांच्या कार्यकाळात उभारण्यात आला होता. त्या काळात या परिसरात सुंदर बगीचा, धबधब्यासारखे आकर्षक कारंजे, विद्युत रोषणाई आणि उत्कृष्ट सजावट करण्यात आली होती. हा परिसर नगरच्या वैभवाचे प्रतीक मानला जात होता. पंडित नेहरू यांचा पुतळा ही नगरची शान होती.

मात्र आज त्या परिसरात अस्वच्छता, कचरा आणि दुर्गंधीचे वातावरण निर्माण झाले आहे. येथे साफसफाई होत नसल्यास ती जबाबदारी पूर्णपणे महानगरपालिका प्रशासनाची आहे. आरोग्य विभाग आणि उद्यान विभागाने नियमित स्वच्छता व देखभाल केल्यास हा प्रश्न सहज मार्गी लागू शकतो. परिसरात अवैध प्रकार सुरू असतील किंवा



काही तळीराम तेथे बसून मद्यप्राशन करत असतील तर त्यावर नियंत्रण ठेवणे हे पोलीस प्रशासन आणि राज्य उत्पादन शुल्क विभागाचे कर्तव्य आहे. त्यामुळे प्रशासनाच्या अपयशाचे खापर पंडित नेहरू यांच्या पुतळ्यावर फोडणे चुकीचे आहे, असे चव्हाण यांनी म्हटले आहे.

या परिसराच्या सुशोभीकरणा बाबत तत्कालीन नगरसेविका शीला दीप चव्हाण यांनी मनपाला ज्यावेळी स्वच्छ सर्वेक्षण अभियानात ५ कोटी रुपयांचे बक्षीस मिळाले होते. त्या निधीतून हे सुशोभीकरण करण्याची मागणी लेखी पत्राद्वारे व महासभेत प्रश्न उपस्थित करून केली होती. पण मनपा प्रशासनाने त्याकडं सोयीस्करपणे दुर्लक्ष केले. ही दुर्दैवाची बाब आहे, असेही ते म्हणाले.

संबंधित व्यक्तीविरोधात कायदेशीर मार्गाने योग्य ती कारवाई करण्यात येईल. तसेच महानगरपालिकेने कोणत्याही दबावाला बळी न पडता पुतळा हटवण्यासंदर्भात कोणताही चुकीचा निर्णय घेऊ नये, असे आवाहनही दीप चव्हाण यांनी केले आहे.


**समाचार**
**वाचकांना नम्र सूचना**

**समाचार** वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.


### मुंबई शेअर भाव

**ट्रम्प- रुपयाची घसरण (९६.८२)**

**सेन्सेक्स मात्र १०० ने उंचावला**

अशोक पटवा हजार
(शेअर सबब्रोकर)
फोन-२४५२५२७, २४५२२६४
मोबा. ८७८८६९९९६१

**दिनांक २०-५-२०२६ दुपारी २ पर्यंतचे भाव**

| | |
|---|---|
| आजचा इंडेक्स : | ७५३०२ |
| एसीसी | १३५१-५२ |
| एशियन पेंट | २६०८-०९ |
| बजाज ऑटो लि. | १०४२९-३० |
| बलराम फूड चिनी | ५३७-३८ |
| भारत फोर्ज | १८७८-७९ |
| क्रॉम्प्टन | २९१-९२ |
| डीएलएफ | ५८१-८२ |
| डॉ. रेड्डीज् लॅब | १३२९-३० |
| ग्रॅफाईट इंडिया | ७३५-३६ |
| हिंदुस्थान युनिलिव्हर | २२१८-१९ |
| आयटीसी लि. | ३०६-०७ |
| एल ॲण्ड टी लि. | ३९१३-१४ |
| रिलायन्स इंड. | १३५८-५९ |
| एसबीआय | ९५१-५२ |
| टाटा मोटर्स | ३७६-७७ |
| टाटा स्टील | २०५-०६ |
| टीसीएस | २३२९-३० |
| लक्ष्मी ऑरगॅनिक | १५८-५९ |
| कोव्हान्स फार्मा | ४२२-२३ |


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या विक्रीचा व्यवहार केलेला आहे. सदर मिळकत ही विद्यमान मालक यांचे मालकीची असून, त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात व ताब्यात आहे. सदर मिळकत पूर्णपणे निर्वेध, निजोखमी आहे, अशी खरेदी देणाराने म्हणजेच विद्यमान मालकाने खात्री व भरवसा दिला आहे. तथापि कोणाचीही तक्रार राहू नये, म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही वाद चालू असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाईहुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लिज, इजमेन्ट अगर इतर कोणताही वाद चालू असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर पोस्टाने योग्य ते कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व खात्री करून द्यावी. तसेच हरकत न कळविता परस्पर व वर्तमानपत्रातून जाहीर केलेल्या हरकतींची काही एक दखल घेतली जाणार नाही. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्यांचे काही हक्क, हितसंबंध आहे, त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे, असे समजून आमचे अशील खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग कोणतीही तक्रार चालणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर (अहमदनगर) पोट तुकडी नगरपैकी महानगरपालिका हद्दीतील मौजे सावेडी येथील खालील वर्णनाची मिळकत –

| | | |
|---|---|---|
| **सर्व्हे नं. : ११** | **प्लॉट नं. – ५७** | **क्षेत्रफळ – २७८.८१ चौ. मी.** |

यापैकी विद्यमान मालक यांच्या मालकीचे प्लॉटचे क्षेत्र १८५.८७ चौ.मी. व त्यावरील असलेले संपूर्ण बांधकाम क्षेत्र ही मिळकत. यांसी चतु:सीमा –

| पूर्वेस | पश्चिमेस | दक्षिणेस | उत्तरेस |
|---|---|---|---|
| तीस फूट रुंदीचा रस्ता | प्लॉट नंबर ७१ व ७० | प्लॉट नंबर ५८ | प्लॉट नंबर ५६ |

दिनांक : २०/०५/२०२६

सदर मिळकतीचे विद्यमान मालक –
**१) दिलीप पंढरीनाथ देशपांडे,** रा. सावेडी अहिल्यानगर (अहमदनगर),
**२) सुषमा प्रदीप देशपांडे,** रा. सावेडी, अहिल्यानगर (अहमदनगर)

**ॲड. प्रणव सुधीर धर्माधिकारी**
**ॲड. नूतन प्रणव धर्माधिकारी**
पत्ता : भंडारी सावज अपार्टमेंट, कोठी रोड, अहिल्यानगर (अहमदनगर)
मो. नं. ९०२८००८२००

# योगशिक्षक लोखंडे यांचा पुरस्काराने गौरव

**समाचार/नगर-दि.२०**

समाजाला निरोगी व सकारात्मक जीवनशैलीकडे मार्गदर्शन करणारे योगशिक्षक रामचंद्र बाबूराव लोखंडे यांना धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालयाच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज उत्कृष्ट समाजसेवक पुरस्कार' प्रदान करून गौरविण्यात आले. ग्रामीण भागात योग, प्राणायाम, सुदर्शन क्रिया आणि ध्यान यांचा प्रसार करून सामाजिक, आरोग्यविषयक आणि जनजागृतीपर कार्याची दखल घेत हा सन्मान करण्यात आला.



अहमदनगर बार असोसिएशनचे अध्यक्ष ड. कृष्णा झावरे आणि विशेष सरकारी वकील ड. सुरेश लगड यांच्या हस्ते रामचंद्र लोखंडे यांना पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी साहित्यिक प्रतिभा खैरनार, युवा कीर्तनकार ह.भ.प. दिपाली गणगे-कोकाटे, लावणी सम्राज्ञी रोहिणी थोरात, संमेलनाचे संयोजक पै. नाना डोंगरे, ज्येष्ठ कवी चंद्रकांत पालवे, कवी संमेलनाचे अध्यक्ष चंद्रकांत चाबुकस्वार, माजी सरपंच साहेबराव बोडखे, डॉ. विजय जाधव, मुख्याध्यापक उत्तम कांडेकर, उद्योजक दिलावर शेख आदी मान्यवर उपस्थित होते.

रामचंद्र लोखंडे हे ग्रामीण भागात सातत्याने योग, प्राणायाम, सुदर्शन क्रिया आणि ध्यानधारणा यांची शिबिरे आयोजित करून नागरिकांना शारीरिक व मानसिक आरोग्याबाबत मार्गदर्शन करत आहेत. ते आर्ट ऑफ लिव्हिंग' संस्थेचे प्रशिक्षक असून, ग्रामीण युवक आणि नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न करत आहेत.

# धनादेश अनादर प्रकरणी कर्जदारास दोन महिने कारावास

**समाचार/नगर-दि.२०**

महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था, भिंगार यांना कर्जाच्या हप्त्यापोटी दिलेला धनादेश वटला नाही म्हणून आरोपी मच्छिंद्र पंढरीनाथ कदम रा. मु. भातोडी, पो. पारगाव ता. जिल्हा अहमदनगर यास डी. डी. कर्वे (१६ वे अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी) यांनी २ महिन्यांचा साधा कारावास तथा रक्कम रु. ३.३०.०००/- दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. आरोपीन सदर दंडाचा भरणा न केल्यास त्याला मुख्य कारावासाचे व्यतिरिक्त १५ दिवसाचा साधा कारावास भोगावा लागेल अशी शिक्षा सुनावली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, महात्मा फुले नागरी सहकारी पतसंस्था भिंगार, अहमदनगर यांच्याकडून मच्छिंद्र पंढरीनाथ कदम रा. मु. भातोडी, पो. पारगाव, ता. जि. अहमदनगर यांनी कर्ज रक्कम रु. १८.००.०००/- व्यवसाय वाढीसाठी घेतलेले होते व सदर कर्जाच्या थकबाकीपोटी दि. १८/१०/२०१९ रोजी रु. २.००.०००/- भिंगार अर्बन को-ऑप. बँक भिंगार, शाखा माळीवाडा, अहमदनगर या बँकेचा चेक नं. २६९३११ चा दिला होता. सदर धनादेश न वटल्यामुळे पतसंस्थेने मच्छिंद्र पंढरीनाथ कदम यांच्यावर एन. आय. ॲक्ट १३८ नुसार फौजदारी खटला दाखल केला होता. या खटल्यात फिर्यादी संस्थेचे अधिकारी राजेंद्र काशिनाथ पांढरे यांनी दिलेल्या साक्ष व पुराव्याच्या आधारे गुन्हा सिध्द झाल्याने मच्छिंद्र पंढरीनाथ कदम यांना दोषी ठरवून मे. श्री. डी.डी. कर्वे साहेब यांनी ममच्छिंद्र पंढरीनाथ कदम यांना २ महिने साधी कैद व ३.३०.०००/- रु दंड ठोठावला असून त्या रकमेतून फिर्यादी संस्थेस ३.२७.०००/- रु देण्याचा आदेश केलेला आहे. दंडाची रक्कम न भरल्यास आणखी १५ दिवस साधी कैद असा आदेश दिला. फिर्यादी संस्थेतर्फे ॲड. विनायक तोडमल यांनी काम पाहिले.

## प्रभाग तीनमध्ये पेव्हिंग ब्लॉक कामाचा शुभारंभ

# योजना जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी प्राधान्य - महापौर

**समाचार/नगर-दि.२०**

महानगरपालिका ही नागरिकांना मूलभूत सेवा-सुविधा देणारी संस्था असून नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित प्रश्न सोडविणे हीच खरी लोकसेवा आहे. शहरातील प्रत्येक प्रभागामध्ये विकासकामे करताना केवळ तात्पुरती नव्हे तर कायमस्वरूपी आणि नियोजनबद्ध कामे होणे गरजेचे आहे. एकदा विकासकामे योग्य पद्धतीने मार्गी लागल्यानंतर तीच कामे पुन्हा करण्याची वेळ येत नाही. नागरिकांना चांगले रस्ते, नियमित पाणीपुरवठा, स्वच्छता, प्रकाश व्यवस्था तसेच ओपन स्पेसच्या माध्यमातून चांगली सार्वजनिक जागा उपलब्ध व्हावी हीच आपली प्राथमिकता असल्याचे प्रतिपादन महापौर ज्योती गाडे यांनी केले.



प्रभाग क्रमांक तीनमधील दळवी मळा, सर्वोदय कॉलनी आणि सागरीका कॉलनी येथे ओपन स्पेस सुशोभीकरण व पेव्हिंग ब्लॉक बसविण्याच्या कामाचा शुभारंभ महापौर गाडे यांच्या हस्ते झाला. यावेळी अशोक पाटील, स्वप्नील गोरे, विजया पाटील, अजय ख्रिस्ती, रामभाऊ ठाणगे, रवींद्र चोबे, वैशाली सूर्यवंशी, सुदाम वाबळे आदींसह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

महापौर म्हणाल्या, की, ओपन स्पेसचे सुशोभीकरण हे फक्त सौंदर्यीकरण नसून नागरिकांना दर्जेदार सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना परिसरात चांगली व सुरक्षित जागा मिळावी, यासाठी महानगरपालिकेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविले जात आहेत. विकासकामांमध्ये पारदर्शकता ठेवत नागरिकांना विश्वासात घेऊन काम करण्यावर भर दिला जात आहे.

# अधिक मासानिमित्त जूनमध्ये धार्मिक कार्यक्रम

**समाचार/नगर-दि.२०**

श्री संत सद्गुरु सखाराम महाराजांच्या आशीर्वादाने व प.पूज्य. प्रसाद महाराजांच्या प्रेरणा मार्गदर्शन व उपस्थितीमध्ये दि. ३ ते ५ जून रोजी पुरुषोत्तम (अधिक) मास निमित्त बंधन लॉन्स, सावेडी, येथे अमळनेरकर महाराज सेवा समितीच्या वतीने कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



या कार्यक्रमांमध्ये प्रामुख्याने ३ जून, ४ जून व ५ जून रोजी नऊ कुंडी श्री विष्णू याग, सामवेद व शुक्ल यजुर्वेद पारायण, श्री संत सद्गुरु सखाराम महाराज महाराज जीवन चरित्र व समाजसेवा या विषयावर आधारित ह.भ.प. महेश जोशी महाराजांचे प्रवचन तसेच ३ व ४ जूनला शिष्य मंडळींकडून प.पूज्य. गुरूवर्य प्रसाद महाराजांच्या तुला करण्यात येणार आहेत. दि. ३ जून रोजी ह.भ.प. प्रकाश नंदगिरी महाराज देवगड संस्थान व ४ जून रोजी विद्याभूषण गुरूवर्य ह.भ.प. मुकुंद काका जाटदेवळेकर महाराज यांचा संत पूजनाचा कार्यक्रम होणार आहे. दिनांक ३ जून रोजी रात्री ह. भ. प. ऋषिकेश महाराज यांचे सत्संग कीर्तन होईल व दिनांक ४ जून रोजी रात्री ह. भ. प. राम महाराज झिंजुर्गे यांचे सत्संग कीर्तन होणार आहे. ५ जून रोजी ह. भ. प. गुरुराज महाराज देगलूरकर यांचे सकाळी काल्याचे किर्तन आयोजित केले आहे. दि. ३ जूनला स्वस्तिक हौस्पिटलच्या सहकार्याने आपण मोफत नेत्ररोग तपासणी शिबिराचे आयोजन केले आहे, या शिबिरात नगर जिल्ह्यातील प्रसिद्ध नेत्र विकार तज्ञ डॉ. प्रफुल चौधरी हे नेत्र तपासणी करणार आहेत व दि. ४ जून रोजी आपण जन कल्याण रक्तपेढी, अहिल्या नगरच्या सहकार्याने भव्य रक्तदान शिबीर आयोजित केले आहे.

आपल्या या अधिक मासानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमांचे पत्रिकेचे सर्व अमळनेरकर महाराजांच्या अ.नगर मधील शिष्य मंडळींच्या उपस्थितीत आपल्या नगरचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती मंदिर येथे विधीवत कार्यक्रम पत्रिका पूजन झाले.

# ज्येष्ठांचे ज्ञान व अनुभव नवीन पिढीला मार्गदर्शक : मुनोत



**समाचार/नगर-दि.२०**

समाजातील ज्येष्ठ व्यक्तींचे ज्ञान व अनुभव नवीन पिढीला कायम मार्गदर्शक असते. मार्केट यार्ड येथील प्रसिद्ध व्यापारी तथा जैन ओसवाल पतसंस्थेचे माजी चेअरमन व विद्यमान तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे यांचे व्यक्तिमत्त्व सर्वांना प्रेरणा देणारे आहे. सहकार महर्षी स्व. सुवालालजी गुंदेचा यांचे निकटवर्तीय असलेल्या गुगळे यांनी पतसंस्थेच्या रौप्य महोत्सवी वाटचालीत महत्वपूर्ण योगदान दिले आहे. गुगळे यांच्यासारखे अनुभवी व्यक्तीमत्व समाजाला कायम दिशा देतात असे प्रतिपादन जय आनंद महावीर युवक मंडळाचे अध्यक्ष शैलेश मुनोत यांनी केले.

सहकार महर्षी सुवालालजी गुंदेचा जैन ओसवाल पतसंस्थेचे माजी चेअरमन तथा विद्यमान तज्ज्ञ संचालक शांतीलाल गुगळे यांचा वाढदिवसानिमित्त नवीपेठ येथे शैलेश मुनोत यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी जैन ओसवाल पतसंस्थेचे पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन शैलेश गांधी, संचालक संतोष गांधी, मंडळाचे सेक्रेटरी आनंद मुथा, बाबालाल गांधी, सुरेश फिरोदिया आदी उपस्थित होते.

शैलेश गांधी म्हणाले की, शांतीलाल गुगळे हे पतसंस्थेच्या प्रगतीसाठी कायम महत्त्वाचे मार्गदर्शन करतात. स्व. सुवालालजी गुंदेचा यांना अभिप्रेत शिस्तबद्ध आणि विश्वासार्ह कारभारासाठी ते कायम आग्रही असतात. त्यामुळेच संस्थेने यशस्वीपणे रौप्य महोत्सवी वाटचाल केली आहे. शांतीलाल गुगळे म्हणाले की, आज डिजिटल तंत्रज्ञानाच्या आधुनिक युगात तरूणाई नाविन्यपूर्ण विचार मांडत असते. या आधुनिक विचारांना अनुभवाची जोड मिळाली तर कोणतीही संस्था नक्कीच प्रगती करते. तरूणाई सोबत सामाजिक कार्य तसेच पतसंस्थेत काम करताना मनस्वी आनंद मिळतो. जय आनंद महावीर युवक मंडळाच्या सामाजिक, धार्मिक कार्याचेही नेहमीच कौतुक वाटते.

# स्टार हेल्थचा वर्धापनदिन उत्साहात



**समाचार/नगर-दि.२०**

स्टार हेल्थच्या २० व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रम मोठ्या उत्साहात आणि आनंदात पार पडला. या सोहळ्यास क्लब सदस्य, सल्लागार, नेते व कर्मचारी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात रीजनल हेड विक्रांत व रणजित यांच्या मार्गदर्शनाने झाली.

यावेळी अनेक यशस्वी सल्लागारांनी स्टार हेल्थमधील आपले अनुभव आणि यशस्वी प्रवास उपस्थितांसमोर मांडले. त्यांच्या प्रेरणादायी अनुभवांमुळे कार्यक्रमात सकारात्मक वातावरण निर्माण झाले. २० व्या वर्धापन दिनानिमित्त सर्व सल्लागार व सदस्यांसाठी हेल्थ चेक-अप कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. तसेच वर्धापन दिन शाखास्तरीय स्पर्धेतील पात्र विजेत्यांना भेटवस्तू व प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. या सन्मान सोहळ्यात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सल्लागारांचा गौरव करण्यात आला.

# ११ तास वीज, पिकविम्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**समाचार/नगर-दि.२०**

संगमनेर तालुक्याला भंडारदरा व निळवंडे धरणाचे हक्काचे पाणी मिळावे, रोटेशन काळात शेतीसाठी पूर्ण दाबाने ११ तास वीजपुरवठा करावा तसेच शेतकऱ्यांना तातडीने पिकविमा मंजूर करावा, या प्रमुख मागण्यांसाठी संगमनेर तालुक्यातील कार्यकर्त्यांनी जिल्हाधिकारी पंकज आशिया यांना निवेदन दिले.

महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते तथा माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली संगमनेर तालुक्याने प्रतिकूल परिस्थितीतही विकासाची वाटचाल केली आहे. मात्र गेल्या काही दिवसांपासून तालुक्याच्या पाणी व वीज प्रश्नाकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.यावेळी कारखान्याचे व्हा. चेअरमन पांडुरंग पाटील घुले, राज्य साखर संघाचे उपाध्यक्ष बाबासाहेब ओहोळ, शेतकी संघाचे चेअरमन संपतराव डोंगरे, फेडरेशनचे चेअरमन राजेंद्र गुंजाळ, नानासाहेब शिंदे, मीनानाथ वर्पे, विनोद हासे, सतीश वर्पे, गुलाबराव देशमुख, विलास शिंदे, अण्णासाहेब राहिंज, बाळासाहेब राहणे, नामदेव शिंदे, दादासाहेब देशमुख, भाऊसाहेब शिंदे, मुकेश काकड, दत्तात्रय वाघ, कैलास इंगळे, रावसाहेब काकड, जगन दिघे, शांताराम दिघे, कचरू लांडगे, नवनाथ देशमाने, भास्करराव पानसरे, शेखर वाघ, बाळासाहेब फापाळे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. त्यानंतर वीज वितरण विभागाच्या मुख्य अधीक्षक अभियंत्यांनाही निवेदन देण्यात आले.निवेदनात म्हटले आहे की, संगमनेर तालुका हा पर्जन्यछायेतील, डोंगराळ व अतिदुष्काळी भाग असून येथे दरवर्षी सरासरी दहा इंचांपेक्षाही कमी पाऊस पडतो. मोठ्या संघर्षानंतर १९८९ मध्ये संगमनेर तालुक्याला हक्काचे ३० टक्के पाणी मंजूर झाले होते. तसेच उपसा सिंचन योजनांसाठी आवर्तन काळात दररोज किमान १६ तास वीजपुरवठा आवश्यक असल्याचे आदेश असतानाही प्रत्यक्षात पुरेशा वीजेचा पुरवठा होत नसल्याची तक्रार करण्यात आली.वीज नियामक आयोगाच्या निर्णयानंतर २०१० मध्ये रोटेशन काळात ११ तास पूर्ण दाबाने वीज देण्याचे आदेश देण्यात आले होते. मात्र गेल्या दोन वर्षांपासून हा पुरवठा बंद झाल्याने शेतकऱ्यांना हक्काचे पाणी उचलता येत नसल्याचा आरोप करण्यात आला.

# 'प्रवरा ग्रामीण'चे घवघवीत यश

**समाचार/नगर-दि.२०**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने घेण्यात आलेल्या इयत्ता पाचवी आणि आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेने घवघवीत यश संपादन केले आहे. संस्थेच्या विविध शाखांमधील इयत्ता पाचवीच्या २४७ तर इयत्ता आठवीच्या २४८ विद्यार्थ्यांनी गुणवत्तेमध्ये स्थान मिळवून निकालाची परंपरा कायम राखली असल्याची माहिती संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी दिली. २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शिष्यवृत्ती परीक्षेस बसलेल्या संस्थेतील इयत्ता पाचवीतील २४७ विद्यार्थ्यांनी गुणवत्तेमध्ये यश संपादन केले आहे. तसेच इयत्ता आठवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये २४८ विद्यार्थ्यांनी यश मिळवून संस्थेचा शैक्षणिक गुणवत्तेचा आलेख अधिक उंचावला असल्याचे डॉ. सुस्मिता विखे पाटील यांनी सांगितले. प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्था विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता स्पर्धात्मक वातावरणात घडविण्यावर भर देत आहे. विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्षेत्रात मागे राहू नये, यासाठी उपक्रम राबविले जातात.

# जिल्हा मराठा संस्थेतर्फे महेश जंजिरे यांचा सत्कार

**समाचार/नगर-दि.२०**

स्पर्धा परीक्षांमधील यशासाठी चांगल्या भौतिक सुविधा व मजबूत आर्थिक परिस्थिती या बाबी अजिबातच गरजेच्या नाहीत. त्यासाठी फक्त जिद्द, चिकाटी व मेहनत ही त्रिसुत्रीच खरा मंत्र आहे, असे प्रतिपादन केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत केंद्रीय पोलिस दलात थेट असिस्टंट कमांडंट या पदावर नियुक्ती झालेले महेश जंजिरे यांनी केले.





अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या येथील रेसिडेन्सिअल हायस्कूलचे माजी विद्यार्थी महेश जंजिरे यांची केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत केंद्रीय पोलिस दलात असिस्टंट कमांडंट या पदावर थेट निवड झाली. त्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे व सचिव ॲड. विश्वास आठरे यांच्या हस्ते जंजिरे यांचा विशेष गौरव करण्यात आला. संस्थेच्या खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, सहसचिव मुकेश मुळे, कार्यकारिणी सदस्या अरुणा काळे, बांधकाम व्यावसायिक असलेले महेश यांचे वडील ईश्वर जंजिरे, महिला बचत गटाच्या नेत्या असलेल्या आई सुनीता जंजिरे, वास्तुविशारद पत्नी काजल जंजिरे, रेसिडेन्शियल'चे प्राचार्य धनंजय म्हस्के, उपप्राचार्य दादासाहेब वांढेकर, संस्थेच्या शिवाजी सहकारी भांडाराचे अध्यक्ष प्रा. रवींद्र देवढे, शिक्षक नेते प्रा. डॅा. सुधाकर सुंबे यांच्यासह संस्थेचे पदाधिकारी, प्राध्यापक, शिक्षक, पालक, कर्मचारी व विद्यार्थी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरे व आठरे पाटील यांनी जंजिरे यांच्या युपीएससी'तील अभूतपूर्व यशाचे कौतुक केले.ते म्हणाले, ग्रामीण भागातील तसेच परिस्थितीशी झडगत शिक्षण घेत असलेल्या महेश जंजिरे यांची युपीएसपीतील निवड ही विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी आहे.

महेश जंजिरे यांनी यावेळेस विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेबाबत विशेष मार्गदर्शन केले. राज्य व देशपातळीवरील स्पर्धा परीक्षांमध्ये मराठी मुलांचा टक्का वाढत असला तरी अपेक्षेएवढा नाही, असे जंजिरे म्हणाले. यावेळी जंजिरे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना योग्य उत्तरे देत मार्गदर्शन केले.

रेसिडेन्शिल हायस्कूलचे प्राचार्य धनंजय म्हस्के यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य बाबासाहेब वांढेकर, प्रा.रविंद्र देवडे, प्रा.सुधाकर सुंबे आदींनी विशेष परिश्रम घेतले.

### देवेंद्र भामरे; हिवरे बाजारमधील विकास कामांची पाहणी

# आदर्श गाव योजनेतील प्रलंबित कामे तत्काळ पूर्ण करा

**समाचार/नगर-दि.२०**



मंत्रालयातील मृद व जलसंधारण विभागाचे अवर सचिव तथा विशेष कार्य अधिकारी श्री.देवेंद्र भामरे अहिल्यानगर जिल्ह्यातील आदर्श गाव 'हिवरे बाजार' येथे भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी संपूर्ण हिवरे बाजार परिसराची पाहणी करून जलसंधारण आणि पाणलोट क्षेत्राच्या कामांचा विस्तृत आढावा घेतला, तसेच ग्रामस्थांशी संवाद साधून राज्यातील आदर्श गाव योजनेच्या प्रगतीबाबत पद्मश्री डॉ.पोपटराव पवार यांचेशी सविस्तर चर्चा केली. महाराष्ट्रातील आदर्श गाव योजनेच्या अंतर्गत समाविष्ट असलेल्या गावांनी आपल्या भागातील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करून आदर्श गावांचे महत्त्व पटवून द्यावे, जेणेकरून भविष्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करणे शक्य होईल, असे आवाहन देवेंद्र भामरे यांनी केले आहे.

देवेंद्र भामरे म्हणाले की, माजी मंत्री स्वर्गीय पतंगराव कदम, ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे आणि हिवरे बाजारचे मार्गदर्शक डॉ.पोपटराव पवार यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात आदर्श गावे निर्माण करण्याचा संकल्प हाती घेण्यात आला आहे. या अंतर्गत आतापर्यंत १०० हून अधिक गावे आदर्श करण्यात यश आले असून, सध्या ४६ गावांमध्ये कामे वेगाने सुरू आहेत. भविष्यातील हवामान बदलांचा आणि 'एल निनो'चा संदर्भ देत त्यांनी एक महत्त्वाचा इशारा दिला. पुढील ४ ते ५ वर्षे कमी पावसाची म्हणजेच दुष्काळसदृश असण्याची शक्यता आहे. अशा आव्हानात्मक परिस्थितीत ज्या गावांमध्ये आदर्श गाव योजनेची कामे अपूर्ण आहेत, ती कामे तातडीने व प्राधान्याने पूर्ण करणे गरजेचे आहे. हे मॉडेल जितक्या लवकर यशस्वी होईल, तितकाच मोठा हातभार महाराष्ट्राला दुष्काळ आणि टंचाईमुक्त करण्यासाठी लागेल. हिवरे बाजारने जलसंधारण आणि ग्रामविकासात घेतलेली झेप ही इतर गावांना दिशा देणारी असल्याचेही त्यांनी आवर्जून नमूद केले.

हिवरे बाजारमधील कामांचा अनुभव आणि तेथील यश पाहून, महाराष्ट्रातील इतर सर्व गट व क्षेत्रांत अशाच प्रकारच्या योजना अधिक सुलभतेने कशा राबवता येतील, यावर शासन स्तरावर विचार केला जाईल, तसेच पुढील नियोजनात याचा नक्कीच मोठा फायदा होईल, असा विश्वास उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला. यावेळी हिवरे बाजारच्या सरपंच विमल ठाणगे, चेअरमन छबुराव ठाणगे,व्हा. चेअरमन रामभाऊ चत्तर, बाबासाहेब गुंजाळ, एस. टी. पादीर सर,रो.ना.पादीर यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# नामतालिकेसाठी अर्ज सादर करण्याचे आवाहन

**समाचार/नगर-दि.२०**

महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्या निर्देशानुसार सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी यांची ३ वर्षांसाठी नामतालिका तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यासाठी पात्र व्यक्तींनी दि. ३१ मे २०२६ पर्यंत जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहिल्यानगर यांच्या कार्यालयात अर्ज व आवश्यक कागदपत्रे दोन प्रतींत सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

'क' व 'ड' वर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणुकांसाठी निवडणूक निर्णय अधिकारी नियुक्तीच्या प्रक्रियेसाठी सहकार खात्यातील सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी, शासकीय विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांतील सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी, वकील, सनदी लेखापाल, प्रमाणित लेखापरीक्षक, स्थानिक स्वराज्य संस्थेतील व खासगी अनुदानित शाळांमधील सेवानिवृत्त शिक्षक, तसेच सहकारी संस्थांतील कार्यरत व सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी आणि निवडणूक कामकाजाचा अनुभव असलेल्या व्यक्तींना अर्ज करता येणार आहे.

नामतालिका तयार करण्यासाठी ३० एप्रिल २०२६ रोजी जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली असून अर्ज स्वीकृतीची प्रक्रिया १ मे ते ३१ मे २०२६ या कालावधीत सुरू राहणार आहे. प्राप्त अर्जांची छाननी १ जून ते १५ जून दरम्यान करण्यात येईल. त्यानंतर पात्र निवडणूक निर्णय अधिकारी व प्राधिकृत अधिकारी यांची नामतालिका १६ जून ते २३ जून २०२६ या कालावधीत तयार करण्यात येणार आहे. अंतिम यादी ३० जून २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, पुणे यांच्याकडे सादर करण्यात येणार आहे.

हे अर्ज व आवश्यक कागदपत्रे संबंधित जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करावीत, असे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. तसेच अधिक माहितीसाठी महाराष्ट्र राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण व सहकार आयुक्त यांच्या संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जाणीव फाऊंडेशनचा पुरस्काराने गौरव

**समाचार/नगर-दि.२०**




समाजभान ठेऊन सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या जाणीव फाऊंडेशनला जनकल्याण रक्तपेढीच्या वतीने 'उत्कृष्ट रक्तदान शिबीर संयोजक' गौरव प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

मराठा चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष अरविंद पारगावकर, जनकल्याण रक्तपेढीचे संस्थापक अध्यक्ष डॉ रवींद्र साताळकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे महाराष्ट्रचे प्रांत प्रमुख प्रा नानासाहेब जाधव, रक्तपेढीचे अध्यक्ष अभय मेस्त्री, कार्यवाह सतीश इंदांनी आदींच्या हस्ते जाणीव फाऊंडेशनचे ड व इंजिनीयर कैलाश दिघे, ड विक्रम वाडेकर विश्वस्त मोहटादेवी संस्थान, कर सल्लागार विकास जोशी व इतरांनी गौरव स्वीकारला.

जाणीव फाऊंडेशन गेली १० वर्षे सातत्याने ३१ डिसेंबरला 'दारूच्या बाटल्या रित्या करण्यापेक्षा रक्ताच्या पिशव्या भरा' असे आवाहन करून रक्तदान शिबिरे आयोजित करत आहे. कोरोना महामारीच्या काळात शिबिरे बंद होती, रक्ताचा प्रचंड तुटवडा होता. अशा कठीण लॉकडाऊनच्या परिस्थिती मध्येही जाणीव फाऊंडेशनच्या सदस्यांनी रक्तपेढीत जाऊन रक्तदान करून रुग्णांना मोठा दिलासा दिला होता.

सामाजिक बांधिलकीची दखल घेत हा गौरव करण्यात आला. अशा गौरवामुळे सामाजिक कार्य करण्यास कार्यकर्त्यांना अधिक प्रेरणा मिळते, असे मनोगत मोहटादेवी ट्रस्ट चे विश्वस्त व जाणीव फाऊंडेशनचे ड विक्रम वाडेकर यांनी व्यक्त केले. जाणीव फाऊंडेशन वर्षभर विविध जनजागृतीचे उपक्रम राबवत असते. नायलॉन मांजा बंदी वर गेली ५-६ वर्षे सातत्याने आवाज उठवून, पाठपुरावा केल्यामुळे त्याचा वापर या वर्षी नगण्य झाला आहे. 'तिळगुळ घ्या अन् वाहतूक नियम पाळा' असे आवाहन करून रस्ते वाहतूक सुरक्षा जागृती कार्यक्रम राबविला जातो.

### संचमान्यता तत्काळ इंटिग्रेट करण्याची मागणी

# जिल्ह्यातील शिक्षकांचे वेतन रखडले

**समाचार/नगर-दि.२०**



जिल्ह्यातील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातील संचमान्यता दुरुस्ती झालेल्या शंभराहून अधिक शाळांतील शेकडो शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन अद्यापही रखडले असल्याने मोठी आर्थिक अडचण निर्माण झाली आहे. संबंधित संचमान्यता शालार्थ प्रणालीमध्ये 'इंटिग्रेट' न झाल्यामुळे मे २०२६ महिन्याचे वेतन फॉरवर्ड होत नसल्याचा गंभीर प्रकार समोर आला असून, अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाने याबाबत शिक्षण विभागाकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

या संदर्भात अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष सचिन झगडे, सचिव अमोल ठाणगे आणि उपाध्यक्ष सोमनाथ सुंबे यांनी माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना निवेदन दिले. यावेळी मुख्याध्यापक सुदाम दळवी, दीपक थोरात तसेच कोपरगाव तालुका संघटनेचे कैलास शेळके उपस्थित होते.

शिक्षक संघाने निवेदनात म्हटले आहे की, काही शाळांची सन २०२४-२५ या वर्षातील संचमान्यता पदे शून्य झाली होती. त्यामुळे संबंधित शाळांमधील शिक्षक व कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक कामकाजात अडथळे निर्माण झाले होते. मात्र सन २०२५-२६ च्या संचमान्यतेमध्ये संबंधित शाळांना पुन्हा पदे मंजूर करण्यात आली असून त्यानुसार संचमान्यता दुरुस्तीची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. तथापि, संबंधित संचमान्यता अद्याप शालार्थ प्रणालीमध्ये 'इंटिग्रेट' करण्यात आलेली नाही. परिणामी संबंधित शाळांचे वेतन प्रस्ताव फॉरवर्ड होत नसून मे २०२६ चे वेतन रखडले आहे.

**संचमान्यता दुरुस्ती झाल्यानंतरही शालार्थ प्रणालीमध्ये इंटिग्रेटची प्रक्रिया रखडल्याने शेकडो शिक्षक व कर्मचाऱ्यांचे वेतन अडकले आहे. शिक्षण विभागाने तातडीने कार्यवाही करून संबंधित शाळांचे वेतन सुरळीत करावे.**

**-सचिन झगडे**

(अध्यक्ष, अहिल्यानगर जिल्हा माध्यमिक शिक्षक संघ)

# आनंदधाम येथे दीक्षा समारंभ संपन्न

**समाचार/नगर-दि.२०**



भगवान महावीर स्वामींनी साधु - साध्वी, श्रावक - श्राविका या चतुर्मय तीर्थांची स्थापना करुन आत्मकल्याणाचा मार्ग मुमुक्षु साधकांसाठी प्रशस्त केला. म्हणूनच महावीर स्वामी तीर्थंकर परमात्माच्या रुपाने वंदनीय आहेत. असे अनंत तीर्थंकर परमात्मा या भूतलावर होऊन गेले आहेत व जिनशासन चतुर्विध तीर्थ रुपाने अबाधित आहे.अहिल्यानगरच्या पुण्य भूमीवर राष्ट्रसंत आचार्य सम्राट आनंदऋषिजी म सा, ही दिव्य विभूति १९ व्या शतकात होऊन गेली. परंतु त्यांच्या पदस्पर्शाने, कार्य कर्तृत्वाने पावन उर्जामय झालेली आनंदधाम ची धरा भक्तांसाठी पवित्र श्रध्दा स्थान व तीर्थक्षेत्र आहे. आत्मकल्याणाची श्रेणी पार करताना अनेक मुमुक्षु साधकांनी या धरावर गृहस्थ धर्मातून साधु जीवनात प्रवेश केला आहे.

३ मे २०२६ रोजी पिंपळगाव बसवंत येथील विजया कोचर यांची दीक्षा उपप्रवर्तिनी कंचनकवरजी म सा यांच्या नेश्राय मध्ये या ठिकाणी अत्यंत साध्या स्वरुपात संपन्न झाली व विदिताजी म सा म्हणून त्यांचे संयमी साध्वी जीवनाला सुरुवात झाली. या छोटय़ा दीक्षेनंतर साधु आचरणासाठी अत्यंत अनमोल व महत्वपूर्ण असलेले पाच महाव्रतांचे आरोपण करण्यात येते. विदिताजी म सा यांची ही मोठी दीक्षा विधि महाराष्ट्र प्रवर्तक कुंदनऋषिजी म सा, प्रबुध्द विचारक आदर्शऋषिजी म सा, संस्कार दिवाकर, आलोकऋषिजी म सा इत्यादी साधु - साध्वीजी महाराजांच्या सानिध्यात १९ मे, मंगळवार रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मंगलाचरण, २४ तीर्थंकर स्तवन रुपी चोवीसी, श्री पुच्छिस्सुणं स्तोत्राचे पठन करण्यात आले. मोठ्या दीक्षा विधिसाठी आवश्यक असलेले श्री दशवैकाविक सूत्राचे ४ अध्ययन चे वाचन झाले व श्री विदिताजी म सा यांना मोठी दीक्षा देण्यात आली. आदर्शऋषिजी म सा, यांनी मोठय़ा दीक्षेचे महत्व सांगितले. या कार्यक्रमासाठी श्रध्दाळू भक्तगण व ४० - ४५ संत - सतियाजी महाराज उपस्थित होते. तसेच दशमेशनगर (छ. संभाजीनगर) येथिल श्री संघाने करुणाश्रीजी म सा व नविनज्योतिजी म सा, यांचा चातुर्मास करण्याची भावना व विनंती प्रवर्तकश्रीजींना केली. कुंदनऋषिजी म सा यांनी त्यास स्वीकृती दिली.

# राष्ट्रीय डेंग्यू दिनानिमित्त श्रमिकनगर येथे फेरी




**समाचार/नगर-दि.२०**

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना श्रमिकनगर येथे राष्ट्रीय डेंग्यू दिन साजरा करण्यात आला.

सदर कार्यक्रम डॉ.नारायण वायभासे, जिल्हा हिवताप अधिकारी अहिल्यानगर, डॉ.सतीश राजूरकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी, आरोग्य विभाग,अहिल्यानगर मनपा अहिल्यानगर यांचे मार्गदर्शनाखाली तर मनपा नगरसेवक मनोज दुलम, करण कराळे, पुष्कर कुलकर्णी, प्र.सहा. जिल्हा हिवताप अधिकारी गजेंद्र सांगळे, यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

परिसरात जनजागृती फेरी काढण्यात येऊन नागरिकांना कीटकजन्य आजारांबाबत प्रतिबंधात्मक संदेश देण्यात आला.

सिस्टर मडावी यांनी डेंग्यूवर आधारित गीत सादर केले तर आशा वर्कर यांनी डेंगू प्रतिबंधात्मक उपाययोजना बाबत पथनाट्य सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

प्रास्ताविक डॉ. सृष्टी बनसोडे, यांनी केले तर सूत्रसंचालन डॉ. वैभवी डांगे यांनी केले.

जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. नारायण वायभासे यांनी कीटकजन्य आजारांबाबत नागरिकांनी खबरदारी बाळगण्याची गरज असून प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबत सतर्क राहण्याचे आवाहन केले. डॉ.सतीश राजुरकर यांनी आरोग्य विभाग मनपा तर्फे सातत्याने करण्यात येणाऱ्या उपाययोजनांमुळे शहरातील कीटकजन्य आजारांच्या रुग्णांची संख्या कमी झाली असल्याचे नमूद करून भविष्यात रुग्णसंख्या आटोक्यात ठेवण्यासाठी लोकप्रतिनिधी सोबतच नागरिकांनीही डेंग्यू निर्मूलनात सक्रिय सहभागी होणेबाबत मार्गदर्शन केले.

नगरसेवक मनोज दुलम, करण कराळे, पुष्कर कुलकर्णी यांनी डेंगू आजारावर कोणताही उपचार नसल्याने परिसर स्वच्छता ठेवून आपल्या घरात डासांची उत्पत्ती होणार नाही याबाबत काळजी घेण्याचे आवाहन केले.

सिव्हिल नागरी आरोग्य केंद्राचे डॉ. आरती डापसे यांनी आभार मानले.

# 'शब्द फुलांची ओंजळ' काव्यसंग्रहाचे प्रकाशन

**समाचार/नगर-दि.२०**



संवेदना हृदयात उतरून जेव्हा शब्दरूपी उमटतात, तेव्हा साहित्य आणि काव्यनिर्मिती घडते. काव्य हे साहित्याचे दागिने असून, कमी शब्दांत मोठा आशय व्यक्त करण्याची ताकद कवितेमध्ये असते. विचारांवर विचार करायला लावणारा कवी समाजासाठी महत्त्वाचा असतो. अनुभव जेव्हा अनुभूतीपर्यंत पोहोचतो, तेव्हाच खरी कलाकृती साकारते. ग्रामीण भागातील जीवनाची वास्तवता, अनुभवता आणि कल्पकता कवी सखाराम गोरे यांच्या कवितांमधून प्रभावीपणे उमटते, असे प्रतिपादन माजी प्राचार्य खासेराव शितोळे यांनी केले.

ग्रामीण संस्कृती, माणसांमधील जिव्हाळ्याची नाती, आईचे ममत्व, भक्तीभाव आणि ग्रामीण जीवनातील सहज-सोप्या भावविश्वाचा हृदयस्पर्शी आविष्कार घडविणाऱ्या कवी सखाराम गोरे लिखित व गणराज प्रकाशन प्रकाशित 'शब्द फुलांची ओंजळ' या काव्यसंग्रहाच्या प्रकाशन प्रसंगी अध्यक्षीय भाषणात शितोळे बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्र साहित्य परिषदेचे विभागीय कार्यवाह जयंत येलुलकर, कविवर्य चंद्रकांत पालवे, प्रा. भगवान काटे, प्रकाशक तथा मसाप जिल्हाप्रमुख प्रा. गणेश भगत, कवी सखाराम गोरे, संतोषकुमार गोरे, शिवप्रसाद गोरे, अजय ढमाले, बाळासाहेब चौधरी, सुभाष बर्वे तसेच महानगर ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य उपस्थित होते. प्रास्ताविकात प्रा. गणेश भगत यांनी गणराज प्रकाशनाच्या कार्याचा आढावा घेतला.

जयंत येलुलकर यांनी कवी सखाराम गोरे हे व्यासंगी साहित्यिक असून हा त्यांचा सातवा काव्यसंग्रह असल्याचे सांगितले. कविवर्य चंद्रकांत पालवे यांनी कवी गोरे यांच्या संघर्षमय आणि दारिद्र्यपूर्ण जीवनप्रवासाचा उल्लेख प्रा. भगवान काटे यांनी ग्रामीण भागातील जीवनमूल्ये, संस्कार आणि संवेदना जपणारे साहित्य समाजासाठी अत्यंत आवश्यअक असल्याचे सांगितले.



गुरुपुष्यामृताच्या
शुभमुहूर्तावर सुवर्णखरेदी
म्हणजे समृद्धीची नवी सुरुवात!
1 ग्रॅम च्या पुढील सोन्याच्या दागिन्यांवर
प्रतितोळा ₹3100 सूट*
3 तोळे च्या पुढील सोन्याच्या दागिन्यांवर
प्रतितोळा ₹5100 सूट*
7 तोळे च्या पुढील सोन्याच्या दागिन्यांवर
प्रतितोळा ₹ 7100* सूट
हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर
100%* सूट
कुठल्याही जुन्या हॉलमार्क प्रमाणित सोन्याचा दागिना असो, त्यावर मिळवा
100%* एक्सचेंज
चांदीच्या दागिन्यांच्या मेकिंग चार्जेसवर
तब्बल 50%* सूट
नियम व अटी लागू
A.H. पोखरणा® ज्वेलर्स
जास्त खरेदी करा,
जास्त बचत करा.
www.onevoice.co.in
शाखा १ : सर्जेपुरा, अहिल्यानगर 83 530 50 505
शाखा २ : सथ्था कॉलनी, अहिल्यानगर 800 700 5001